# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९८ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**


**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : २३**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ३ / सप्टेंबर १९९८



## संपादकीय

### मेरा भारत महान

२५ सप्टेंबर १९९८ च्या ( Vol. 281, No. 5385) सायन्स (Science) या विज्ञान संशोधन पत्रिकेत प्रकाशित झालेल्या एका लेखामुळे, भारताने मे १९९८ मध्ये केलेल्या अणुचाचण्यांच्या चर्चेचे तावूत अजून थंड न झाल्याचे दिसून आले. भारता पाठोपाठ पाकिस्ताननेही अणुचाचण्या करून " हम भी कुछ कम नहीं' असे प्रत्युत्तर भारताला दिले. या घटनांमुळे अमेरिका आणि इतर पश्चिमी राष्ट्रांनी भारताला शिक्षा आणि म्हणून भारतावर आर्थिक निर्बंधही लादले. भारताने केलेल्या ५ चाचण्यांमध्ये एक चाचणी ही हायड्रोजन बॉम्बची होती. भारताने आपली पहिली चाचणी १९७४ मध्ये केली होती. १९७४ ते १९९८ या कालावधीत भारताने अणुचाचण्या केल्या नसल्या तरी उपग्रह आणि क्षेपणास्त्रे यांमध्ये बरीच प्रगती करून दाखवली होती. या सर्व प्रगतीचा मूलभूत पाया हा भौतिकी आणि गणिती विज्ञान हा आहे. भारतातील अणुक्षेत्रातील प्रगती ही बुहतांशी भारतीय वैज्ञानिकांनी आपल्या स्वतःच्या कुवतीवर केली आहे. याउलट पाकिस्तानची प्रगती ही बहुतांशी चीन, उत्तर कोरिया आणि इतर पाश्चिमात्य राष्ट्रांकडून उसनवारी किंवा चोरी करून आणलेल्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. अमेरिका इ. पाश्चिमात्य राष्ट्रांचा खरा पोटशूळ हा आहे की, स्वतंत्रपणे भारत एवढी वैज्ञानिक प्रगती करू शकतो ? आणि भारत तशी करू शकला असेल तर या महासत्तांना ती त्यांच्या राजकीय आणि आर्थिक प्रभुत्वाला आव्हान देणारी वाटत आहे.

'सायन्स' मधील लेखांनी भारताने केलेल्या हायड्रोजन बॉम्बच्या चाचणीलाच आव्हान दिले आहे. अशा चाचण्या भूगर्भामध्ये धरणीकंप निर्माण करतात. आणि अशा कंपांची नोंद जगातल्या अनेक, याकरिता बसवलेल्या यंत्रांवर होते. या भूगर्भशास्त्रज्ञांनी अशा कंपनांच्या नोंदींचा पुरावा देत भारतीय चाचणी ही हायड्रोजन बॉम्बच्या क्षमतेची नव्हती असा निष्कर्ष काढला आहे. अर्थातच हा निष्कर्ष काढताना त्यांनी कुठली पद्धती वापरली याचा खुलासा केलेला नाही. थोडक्यात, भारतीय शास्त्रज्ञ असा स्फोट करण्याकरिता लागणाऱ्या तंत्रज्ञानाला जे विज्ञान लागते ते विकसित करण्यात असमर्थ आहेत असाच संदेश यातून ध्वनित केला जातो. दुसरा एक महत्वाचा मुद्दा यामध्ये आहे. तशी सी आय ए (CIA) आणि तत्सम अमेरिकन संस्था अब्जावधी रुपये खर्च करून असे संशोधन आणि चाचणी होण्या अगोदरच त्यांची वाच्यता करून टाकतात. अमेरिकेची गुप्तहेर यंत्रणा किंवा उपग्रह यंत्रणा, ही चाचणी होइस्तोवर तिचा शोध घेऊ शकली नाही, ही वस्तुस्थिती आहे. याची चौकशीही अमेरिकेमध्ये चालू आहे. आपल्याला ही गोष्ट कळू शकली नाही हे दुःखही अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांना आहेच. भारताकडे अशा प्रकारचे विज्ञान उपलब्ध नसेल तर भारतावर आर्थिक निर्बंध लादण्याची किंवा त्यांच्या शास्त्रज्ञांना प्रवासी परवाना नाकारण्याची गरजच काय ? पण अमेरिकेतील आणि

जगातील शास्त्रज्ञांना संपूर्ण कल्पना आहे की भारतीयांनी हे तंत्रज्ञान आणि विज्ञान आत्मसात केले असून हे विकसितही होत आहे. भारतीयांनी आपल्या हायड्रोजन बॉम्बच्या चाचणीकरिता वापरलेले तंत्रज्ञान हाही त्यांच्या डोकेदुखीचा विषय आहे. या भारतीय तंत्रज्ञानामुळे भारत अस्त्र श्रेणीपेक्षा (weapons grade) भट्टी श्रेणीच (reactor grade) प्लुटोनियम (Plutonium) आपल्या तंत्रज्ञानात वापरू शकेल. यामुळे ऊर्जा प्रकल्पातील वापरलेल्या इंधनाचा उपयोगही अण्वस्त्र निर्मितीकरिता भारत करु शकेल. अमेरिकन शास्त्रज्ञांच्या संघटनेने वायुउत्तेजित आरंभक (gas-boosted Primaries) या तंत्रज्ञानाचा वापर करून प्लुटोनियमच्या, या श्रेणीच्या वापरातील अडचणी कशा दूर करता येतात, हे सप्रमाण दाखवून दिले आहे. मेमध्ये भारताने केलेल्या हायड्रोजन बॉम्बच्या चाचणीमध्ये हेच तंत्र वापरले आहे.


हायड्रोजन बॉम्बचा पहिला स्फोट अमेरिकेकडून १ नोव्हेंबर १९५२ मध्ये केला गेला. अमेरिकेशिवाय सोवियेत युनियन, ब्रिटन, फ्रान्स आणि चीन या राष्ट्रांनीही हायड्रोजन बॉम्बचे स्फोट केले आहेत. अर्थातच भारताने वापरलेले तंत्रज्ञान हे या देशांनी वापरलेल्या तंत्रज्ञानापेक्षा वेगळे आहे. ॲटमबॉम्ब आणि हायड्रोजन बॉम्ब यांच्या विध्वंसक्षमते मध्ये तर जमीनअस्मानाचा फरक आहे. भूगर्भ शास्त्रज्ञांनी जरी भारतीय स्फोटांबद्दल साशंकता व्यक्त केली असली तरी जगातल्या कुठल्याही अणुवैज्ञानिकांनी त्यांच्याशी सहमती दाखवलेली नाही. १६ सप्टेंबर १९९८ च्या 'लॉसएंजिलीस टाइम्स' मध्ये टेक किडर (Take Kidder) या अण्वस्त्र शास्त्रज्ञांनी, 'भूकंपतज्ञांना क्षेपणास्त्र निर्मितीची फारशी कल्पना नसते' हे स्पष्टपणे नमूद करुन ठेवले आहे. अभ्यासकांच्या अंदाजाप्रमाणे ४०० अण्वस्त्रे बनवता येतील इतके पुनर्प्रक्रिया केलेले (reprocesed) प्लुटोनियम भारताकडे असून सुमारे १२०० अण्वस्त्रे तयार करता येतील इतके प्लुटोनियम ऊर्जा प्रकल्पांतून लवकरच मिळू शकेल. काही संशोधकांच्या म्हणण्याप्रमाणे भारताच्या अणुचाचणीक्षमते साठी १९६५ सालापासूनच संशोधनाला सुरवात झाली आहे. १९६८ साली प्रकाशित झालेल्या आपल्या 'India's Nuclear Dilemma' या पुस्तकात १९७० नंतर भारत दरवर्षी एक अणुबॉम्ब बनवू शकेल असे मिरचंदानी यांनी लिहून ठेवले आहे. डेविड अल्ब्राइट (David Albright) आणि टिम झामोरा (Tim Zamora) या बुलेटिन ऑफ द ॲटोमिक सायंटिस्टस् (Bulletin of the Atomic Scientists) च्या वार्ताहराने १९८९ मध्येच लिहून ठेवले आहे की पाकिस्तानने जर का ॲटमबॉम्बची चाचणी केली तर २ महिन्यांत भारत हायड्रोजन बॉम्बची चाचणी करू शकेल, इतकी भारताची तयारी आहे. गेल्या २० वर्षांमध्ये न्यूयॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्ट आणि जेन्स डिफेन्स विक्लीच्या प्रकाशनांमधून भारतामध्ये विकसित होत असलेल्या अणुविज्ञानाबद्दल भरपूर लिहून आले आहे. यामुळेच 'पृथ्वी', 'अग्नी' हे भारताचे क्षेपणास्त्र कार्यक्रम बंद करण्याकरिता पाश्चात्य राष्ट्रांकडून अनेक वेळा दडपणेही आली आहेत. अण्वस्त्र प्रसारबंदीच्या संदर्भात असलेल्या अनेक जागतिक संघटना आणि करार हे प्रामुख्याने अण्वस्त्र क्षमता असलेल्या पाच राष्ट्रांची सोय बघणारे आहेत. भारत त्यांच्या व्यूहरचनेमध्ये फारसा सापडला गेला नाही. आणि अशा करारांवर सह्या करायलाही भारताने नकारच दिला आहे. यामुळेही भारताने या पाश्चात्य महासत्तांचा रोष ओढवून घेतला आहे. चीन आणि पाकिस्तान यांसारखी अण्वस्त्रसज्ज राष्ट्रे शेजारी असताना भारतापुढे दुसरा पर्याय नाही. भारतातले काही राजकीय पुढारी हे वैयक्तिक महत्वाकांक्षेला बळी पडून जागतिक शांततेचे चऱ्हाट आणि गुऱ्हाळ नेहमी लावत असतात.

संगणक क्षेत्रामध्ये निवासी आणि अनिवासी भारतीयांनी आज नेत्रदीपक प्रगती केली आहे. भारतामध्ये राजकीय आणि आर्थिक दिशा ही स्वातंत्र्यानंतर योग्यरीतीने मिळाली असती तर भारतही जगातील एक महासत्तावान देश झाला असता. सडलेल्या निर्लज्ज राजकीय यंत्रणेने हा देश आज दिवाळखोर आणि फुकटखाऊ बनवून ठेवला आहे. सत्तेची सर्व सूत्रे आपल्याकडे रहावीत म्हणून त्यांनी परवानाराज्य निर्माण केले. प्रत्येक क्षेत्रामध्ये नियंत्रणे आणली. महापालिकेपासून केंद्रापर्यंत नागरिकांवर करांचे प्रचंड ओझे लादले. आणि यामुळेच या देशाचा नागरिक

(पान क्र. ४० वर)

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष तिसरे/ अंक ३ / सप्टेंबर १९९८

**संपादक**
डॉ. विजय वा. बेडेकर

**सहसंपादक**
श्री. प्रकाश ल. वैद्य

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**वार्षिक देणगी**
रु. २०० / -

**मुद्रक :**
परफेक्ट प्रिण्ट्स,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) | सुभाषित | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१९-२०) भारतीय देवालय-एक संक्षिप्त परीक्षण | डॉ. र.पु. कुलकर्णी | ५ |
| ४) | 'एकनाथांचे रूक्मिणी स्वयंवर' | श्री. श.गो. धोपाटे | १७ |
| ५) | चक्रव्युह | प्रा. य. भ. भिडे | २० |
| ६) | वाचन व ग्रंथालये | श्री. विश्वनाथ शेंडे | २४ |
| ७) | अलीकडेच घेतलेला लक्षणीय ग्रंथ | प्रा. मोहन पाठक | २७ |
| ८) | ॥ बोंबल्या राक्षसाचा बंदोबस्त... एक समस्या ॥ | प्रा. मोहन पाठक | २९ |
| ९) | घटक संस्थांच्या ग्रंथालयांचे संगणीकरण | प्रा. मोहन पाठक | ३२ |
| १०) | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३४ |

# लेखक - परिचय

१. **डॉ. विजय वा. बेडेकर**
वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. **प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर**
संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधूननिवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती; संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. स्तबक या पुस्तकाचे लेखक.

३. **श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी**
अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

४. **श्री. शशिकांत गो. धोपाटे**
रसायनशास्त्राचे पदवीधर, स्वतंत्र व्यवसाय, प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचे नाणेशास्त्र विभाग प्रमुख, नाणेशास्त्रावर संशोधनपर लेख, संशोधनपत्रिकेतून प्रकाशित, अनेक चर्चासत्रांमधून नाणेशास्त्रविषयक शोधनिबंध सादर, नाणेसंग्रह व नाणीशास्त्राचा विशेष अभ्यास.

५. **प्रा. य.भ. भिडे**
प्राध्यापक, ना.गो. बेडेकर महाविद्यालय, ठाणे, सामाजिक चळवळीत सहभाग.

६. **श्री. विश्वनाथ शेंडे**
ग्रंथपाल , प्राच्य विद्या अभ्यास संस्था, ठाणे. सामाजिक व ऐतिहासिक विषयांवर लेख प्रकाशित.

७. **प्रा. मोहन पाठक**
गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

# सुभाषित

कलहान्तानि हर्म्याणि कुवाक्यान्तं च सौहृदम्
कुराजान्तानि राष्ट्राणि कुकर्मान्तं यशोनृणाम् ॥१ ॥

अचला कमला यस्य कस्य मित्रं महीपतिः ।
शरीरं च स्थिरं कस्य कस्य वश्या वराङ्गना ॥ २ ॥

जनिता चोपनेता च यश्च विद्यां प्रयच्छति ।
अन्नदाता भयत्राता पञ्चैते पितरः स्मृताः ॥३ ॥

धर्मार्थौ यत्र न स्यातां शुश्रूषा वापि तद्विधा ।
तत्र विद्या न वक्तव्या शुभं बीजमिवोषरे ॥४॥

नास्ति विद्यासमं चक्षुर्नास्ति सत्यसमं तपः ।
नास्ति रागसमं दुःखं नास्ति त्यागसमं सुखम् ॥५॥

डॉ. मो. दि. पराडकर

मोठमोठे प्रसाद किंवा उंच उंच हवेल्याही भांडणामुळे नष्ट होतात असे पहिल्या श्लोकाच्या पहिल्या चरणाच्या पूर्वार्धात सांगून भव्य प्रासादांत आणि मोठमोठ्या घरांतही भांडणे होतात आणि त्यामुळे सर्व वैभव मातीमोल होते याचा अनुभव आल्यावाचून रहात नाही. किंबहुना जितकी हवेली मोठी तेवढी तीत रहाणाऱ्या व्यक्तींच्या मनातील धुसफूस वाढते आणि मग त्यातूनच तंटा वाढतो आणि मिळवलेले वैभव हळूहळू लयाला जाऊ लागते. जे हर्म्यांचे तेच मित्रत्वाचे(सौहृदम्) वाईट बोलण्यामुळे होते हे दुसऱ्या अर्धात सांगितले. मैत्रीचा नाश हा शेवटी परस्परांच्या परोक्ष निंदेमुळे होते. शब्द हे बाणासारखे असतात; ते एकदा तोंडातून निसटले की त्यांनी निर्माण केलेली मित्राच्या मनाची जखम भरून येणे किती कठीण असते हे लक्षांत घेऊन माणसाने वागले पाहिजे. किंबहुना 'जिह्वेपाशी आहे मित्रत्वाचे सूत्र' हा धडा गिरवण्यासारखा आहे यात शंका नाही. दुसऱ्या ओळीत राष्ट्रे नाहीशी होण्याचे कारण वाईट राजे हे सांगितले. पूर्वकाळी राजा हाच लोकांचा नेता असे. त्याच्या सुयोग्य नेतृत्वावर प्रजेची मदार असे. तोच जर चांगल्या मार्गाने जाणारा नसेल तर प्रजेचे अकल्याण व्हावे हे स्वाभाविकच नव्हे का? म्हणूनच पूर्वकाळी 'यथा राजा तथा प्रजा' असे म्हटले जात असे. आजही नेता आणि अनुयायी यांच्या बाबतीत हे खरेच आहे. कौटिल्यासारख्या विचारवंतानेही, राजा सर्व गुणांनी युक्त असेल तर प्रजेच्या दुर्गुणांवर नियंत्रण ठेवू शकतो तिच्या अवनतीला बांध घालू शकतो, असे म्हटले आहे. राजाच्या किंवा नेत्याच्या गुणांचे अनुकरण सर्व प्रजा म्हणजे अनुयायी करतात. शेवटच्या दोन शब्दांत तर माणसांचे यशही त्यांच्या कुकर्मांमुळे नाहीसे होते हे सांगून सूक्तिकाराने षट्कार मारलेला आहे. यश मिळवण्यापेक्षाही ते टिकवणे कठीण असते; यशोमंदिराच्या पायऱ्या चढून गेल्यानंतर त्या यशाचा कैफ चढतो; बेपरवाई निर्माण होते आणि चांगले करण्याची आवश्यकता नाही असा भ्रम निर्माण होतो आणि हातून वाईट कामे (खोटे बोलणे खुशामद करणे इत्यादी) होऊ लागतात आणि हळूहळू मिळवलेले यश क्षीण होऊन ते पूर्णपणे घालवण्याची वेळ येते. थोडक्यात या श्लोकांत दाखविलेली धोक्याची वळणे समजून त्यांपासून दूर रहाण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

दुसऱ्या श्लोकात चार प्रश्न विचारून अगदी सहज अनुभवाला येणाऱ्या, नव्हे हितकारक गोष्टी थोडक्यात सांगून टाकल्या. कमला म्हणजे लक्ष्मी किंवा संपत्ती ही कोणाजवळ स्थिर रहाते ? उत्तर स्पष्ट आहे , संपत्ती स्थिर रहात नसते; अस्थिरता हा तिचा स्वभाव. ती ज्याला वरते त्याला मात्र वेडावून टाकते. आणि ती आपल्याजवळ नेहमीच राहणार असा भास होऊ लागतो. 'अचिरांशुविलास चञ्चला' अशी लक्ष्मी म्हणजे 'आनुषङ्गिक' योगायोगाने मिळणारे फळ असे महाकवीने म्हटले ते उगीच नव्हे. दुसरा प्रश्नही एक सत्य सांगून टाकणारा आहे. राजा हा कोणाचा मित्र असतो का ? उत्तर 'नाही' हेच खरे. राजवल्लभाला तात्पुरते तसे वाटते परन्तु त्याने तसे न मानणे हे हिताचे ! राजाची मर्जी केव्हा उतरेल ते सांगता येत नाही. राजाबद्दल किंवा आजच्या परिभाषेत उच्चपदस्थ अधिकाऱ्याबद्दल खात्री न देणे चांगले. द्रुपद हा द्रोणाचार्यांचा बालपणीचा किंवा विद्यार्थिदशेतला मित्र, पण तो राजा झाल्यानंतर मित्राच्या नात्याने त्याची विनवणी करणाऱ्या द्रोणाचार्यांना 'कस्य मित्रं महीपतिः' यातील खरेपणाचा अनुभव आला. 'शरीरं च स्थिरं कस्य' हे तर सर्वांनाच माहीत आहे तरीही त्याचे

चोचले पुरविले जातात, त्याला सजविण्यासाठी बराच वेळ दिला जातो. त्यात वावरणाऱ्या मनाच्या विकासाकडे लक्ष द्यावयास वेळ राहत हेही खरेच आहे ! सुन्दर स्त्री हीही कुणाला वश होते ? ती आपल्याला वश आहे असे समजून पुरुष वागतो आणि स्वतःचे नुकसान करून घेतो. पूर्वकाळीच नव्हे तर आधुनिक काळातही सुन्दर असणाऱ्या परंतु हेरगिरी करणाऱ्या स्त्रियांकडून, पाहिजे असलेली शत्रुराष्ट्रांची रहस्ये मिळवण्यात यशस्वी झाल्याची कित्येक उदाहरणे सांगता येतील. 'वराङ्गना' ही मोहात पाडू शकते; ती कोणालाच सर्वार्थाने वश होत नाही असे धरून चालणे श्रेयस्कर.

तिसरा श्लोक जीवनात कोणाला पिता म्हणून मान्य करावे ते सांगतो. जनिता म्हणजे प्रत्यक्ष जन्म देणारा; याच्यापासून सुरवात व्हावी हे स्वाभाविक. 'अङ्गादङ्गात् संभवसि हृदयात् अधिजायसे' हे जुन्या काळी मुलाबद्दल म्हटले ते मुलीलाही लागू होतेच ना? या दृष्टीने 'जनिता' म्हणजे आनुवंशिकतेच्या दृष्टीने जनक महत्त्वाचा ठरतो. हा झाला Nature चा भाग. परंतु जीवनात Nature म्हणजे पोषणाला पर्यायाने संस्कारांनाही महत्व असते व या दृष्टीने इतर व्यक्तीही पित्यासमान मानाव्या हे योग्य. 'उपनयन' म्हणजे मुंज करणारा 'उपनेता' तोही दुसरा जनकच. गुरूजवळ नेणे म्हणजे विद्येच्या संस्काराला पात्र ठरविणे. व्यवहारात मुंज लावणारा हाच सर्व विद्या देतो असे नव्हे. पूर्व काळीही निरनिराळ्या आश्रमात जाऊन आपल्या इच्छेप्रमाणे विद्या देणाऱ्यांच्या अनुमतीने ज्ञान मिळवावे लागत असे. म्हणून जो जो विद्या देतो तो तिसरा पिता. अर्थाने ज्या ज्या व्यक्तीजवळून आपण शिकतो तिला पिता मानण्याची परंपरा होती. स्वतः दत्ताने चौवीस गुरू केल्याची कथा याच पितृत्वाचे महत्व सांगणारी आहे. विद्या देणाऱ्याप्रमाणे मुखी घास भरवणाऱ्याला म्हणजेच अन्न देणाऱ्याला आणि भयापासून संरक्षण देणाऱ्या व्यक्तीलाही पितृत्वाचा मान द्यावा असे सांगून सुभाषितकाराने मनाप्रमाणे शरीराच्या संवर्धनाला सहायभूत ठरणाऱ्या सर्वांचा समावेश करून, माणसाने कृतज्ञतेची भावना आयुष्यात कशी जपावी हेच सांगितले. 'जनिता' नंतर उपनेता म्हणजे उपनयन करणारा व विद्या देणारा यांना स्थान देऊन ज्ञानाचे महत्व मान्य करणे याचाच अर्थ संस्कारांना प्राधान्य देण्याचे कार्य हे आमच्या संस्कृतीच्या मूल्यांशी सुसंगतच आहे.

विद्या देणारा गुरू हे खरे परंतु विद्या ही एक नीधि म्हणजे ठेवा आहे तो कोणाच्या हाती सोपवावा हेही या श्लोकात सांगितले. किंबहुना विद्या कोणाला देऊनये हेच या श्लोकात अधिक महत्त्वाचे. हा सुभाषितकार म्हणतो ज्याच्याकडे धर्म आणि अर्थ हे पुरुषार्थ संभाळण्याची शक्ती नाही आणि यासाठी लागणारी सेवा किंवा परिश्रम करण्याची तयारी नाही त्याला विद्या देऊ नये, हेच सांगणे अधिक महत्त्वाचे. शुश्रूषा सुद्धा धर्म आणि अर्थ यांना अनुकूल म्हणजे अनुरूप असावी म्हणून 'तद्विधा' हा शब्द वापरला. 'शुश्रूषेत' सेवाच येते असे नव्हे तर ऐकण्याची इच्छाही अंतर्भूत आहे. किंबहुना या गुणाशिवाय धर्माची उपासना होत नाही आणि अर्थाची पाठराखण करणे शक्य होणार नाही. ज्या ठिकाणी धर्म म्हणजे कर्तव्यपालनाची प्रेरणा नाही आणि यासाठी लागणारा 'अर्थ' म्हणजे द्रव्य खर्च करण्याची तयारी नाही त्या ठिकाणी विद्यादान करणे म्हणजे ओसाड जागी (उषर) बीज टाकण्यासारखे आहे; त्यातून फळ मिळण्याची आशा कशी बाळगता येणार ? आज आम्ही विद्या देण्याच्या-बाबतीत हा दण्डक पाळीत नसल्याचे वाईट परिणाम आम्ही भोगतो आहोत; म्हणूनच ओसाड जागी बीज पेरल्यासारखी अवस्था झालेली आहे हे मोकळेपणाने मान्य केल्यावाचून गत्यंतर नाही.

शेवटच्या श्लोकात विद्येसारखा डोळा नाही असे सोप्या शब्दात सांगितले आणि सत्याच्या उपासनेसारखी तपस्या नाही असे म्हणून मर्मावर बोट ठेवले. इतकेच नव्हे तर मनात निर्माण होणारे रागद्वेष म्हणजे विकार हेच खरे दुःखाचे कारण आणि त्यागातून मिळणारे सुख दुसऱ्या कशातही नाही हे तीन शब्दांत सांगून टाकले. 'नास्ति रागसमं दुःखम्' हे तर तत्त्वज्ञानाचे सार आहे आणि 'त्यागसमं' सुख नाही असे म्हणून स्थायी समाधानाची गुरुकिल्ली सुभाषितकाराने वाचकाच्या हातात ठेवली असे म्हटले पाहिजे. माणूस ज्या प्रमाणात प्रौढ आणि परिपक होत जातो त्या प्रमाणात या सुभाषितात जीवनाला गवसणी घालण्याची जी शक्ती आहे तिची प्रचीती येऊ लागते. हेच या सुभाषिताचे चिरंजीव सामर्थ्य. यामुळेच संस्कृत ही संस्कारांची भाषा ठरते.

•••

# भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१९-२०)
## भारतीय देवालय-एक संक्षिप्त परीक्षण

डॉ. र. पु. कुलकर्णी

भारतीय देवालय हे भक्ताच्या आळवणीला धावून येणाऱ्या भगवंताचे घरच असते. गर्भगृहात त्या भगवंताची मूर्ती स्थापिलेली असते. त्या मूर्तीच्या ध्यानाकडे बघण्यासाठी व भक्ताच्या सोयीसाठी गर्भगृहाच्या पुढेच मण्डप असतो. या मण्डपात कोठेही बसले तरी देवमूर्तीचे दर्शन होते. गूढ मंडप म्हणजे देवाचा आस्थान मण्डपच (audience) . या आस्थानमण्डपात बसून भक्त देवाची प्रार्थना करतो व त्याला खात्री असते की भगवान आपल्या आळवणीला होकारात्मक उत्तर देईल. भक्ताला एखाद्या संकटातून सुटका हवी असते, आर्थिक विवंचना त्याला छळत असते तीपासून त्याला मुक्ती हवी असते; किंवा त्याच्या मनाने उभारी धरून एखादा अवघड संकल्प, नवीन घर बांधणे, शत्रूवर विजय मिळवणे अशा या जगातल्या आकाक्षांची पूर्ती व्हावी अशी त्याची इच्छा असते. किंवा तुकोबारायासारखा अथवा नामदेवासारखा एखादा भक्त असेल तर त्याला त्या मूर्तिरूप परमेश्वराची सगुण स्वरूपात प्रत्यक्ष भेट हवी असते. ही सर्व गाऱ्हाणी, इच्छा, आकांक्षा यांच्या पूर्तीसाठी परमेश्वराची प्रार्थना करण्याचे मुख्य स्थान म्हणजे देवमूर्ती गर्भागारात असलेले देवालय होय. साहजिकच देवालय हे सामान्य माणसाच्या घरापेक्षा, अगदी राजवाड्यापेक्षा देखील, अति भव्य, सुंदर व मनोहारी तर असावयास हवेच परंतु शिवाय देवाच्या कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम् अशा शक्तीचे प्रदर्शन होण्यासाठी, ते देवालय उंच जागी सर्व गावात ठळकपणे उठून दिसेल अशा जागी असावयास हवे. त्यासाठी पुन्हा देवालयाचे शिखर उंचच उंच आभाळात गेलेले असले पाहिजे; देवालयाची देखणी संपत्ती तेथील अनेक प्रकारच्या कलाकुसरींनी, नर्तकींनी, अनेक देवतांच्या मूर्तींनी अनेक पट वाढावयास हवी. तेवढ्यासाठी देवालयाच्या भिंतीवर, विशेषतः बाहेरून देवदेवतांच्या मूर्ती, सुंदर रमणींच्या रम्य हावभावांतील मूर्ती, घोडे, हत्ती, रथ, लढाईची भव्य दृश्ये, देवदानवांच्या चरित्रांतील प्रसंग, रामायण, महाभारत अशासारख्या महाकाव्यात वर्णिलेले प्रसंग चित्रित केलेले किंवा खोदकाम करून कोरून काढलेले तेथे असावयास हवेत. थोडक्यात, ज्यामुळे भक्ताच्या मनावर देवाच्या दैवी शक्तीचा जास्तीत जास्त जबरदस्त पगडा निर्माण होईल असे पाहिले जाते. देवालयाच्या संकल्पनेतील ही मूलभूत कल्पना आहे. देव मानवापेक्षा मोठा असून मानवाला सर्व संकटांतून तारून नेणारा, सर्व इच्छांची पूर्ती करणारा आहे अशी देवाची छाप त्याच्या भक्तांवर पडली पाहिजे व मानवाला तो मोठाच सर्वस्वी एकलाच आधार आहे, याची खात्री पटली पाहिजे हे देवालयबांधकामाचे मुख्य उद्दिष्ट असते.

भारतीय जनमानसात धर्म व व्यवहार हे एकमेकांत पूर्णपणे गुंतून गेलेले असतात. देवालय बांधणाऱ्या स्थपतीचा अथवा देवालय बांधविणाऱ्या व्यक्तीचा प्रमुख हेतू, मानवी व्यवहारावर देवाचे, धर्माचे, सर्वस्वी नियंत्रण असून सर्व व्यवहार धर्माधिष्ठित असावेत, ते करताना देवाच्या अस्तित्वाची सतत जाणीव असावी म्हणून गावामध्ये देवालय बांधले जाते.

यामुळे देवालय हे त्या गावातील सांस्कृतिक, सामाजिक प्रगतीचे तसेच पुष्कळ वेळा आर्थिक उलाढालीचे मोठे केंद्र होते. देवालयाच्या भव्यतेमुळे व भक्तमपणामुळे गावातील सामाजिक अथवा सांस्कृतिक चळवळीला तसेच मूल्य प्राप्त होते. पुष्कळदा देवालयातील मूर्तीच्या षोडशोपचार पूजेसाठी, अनेक उत्सव पार पाडण्यासाठी, इतकी मोठी जमीन ते देवालय बांधणाऱ्या व्यक्तीने तसेच तो देव ज्यांना पावला असेल अशा अनेक धनाढ्यांनी, तसेच राजाने दिलेली असते की, गावातील सर्वात मोठा जमीनदार हा पुष्कळदा त्या गावातील देवमूर्तीच असते. यामुळे देवालये पेढीचे (Bank) काम करतात; अल्प किंवा नगण्य व्याजात, नडलेल्या शेतकऱ्याला कर्ज देण्याची त्या व्यवस्था करतात. याशिवाय देवालयातील

देवमूर्तीच्या निरनिराळ्या प्रकारांनी केलेल्या दररोजच्या पूजेच्या कार्यक्रमामुळे ती मूर्ती अनेकांच्या उदरनिर्वाहाचे साधन असते. देवाची पूजाअर्चा करणारे पुजारी, व्युत्पन्न, ब्राह्मण, गायक, नर्तक, शिक्षक, सेवेकरी, फुलवाले माळी, शिंपी, धोबी, लिपिक, हिशोब ठेवणारे हिशोबनीस आणि देवाचे भालदार, चोपदार वगैरे अनेक लोकांचे, गावातल्या देवालयाचे अस्तित्व उदरभरणाचे साधन होते.

देवालयातील उत्सव, समारंभ व यात्रा म्हणजे आनंदाला आलेली भरतीच. त्या निमित्ताने सभोवतालचे दूरदूरच्या गावांचे गावकरी जमा होतात. कलाकारांना, व्यापाऱ्यांना व ते ज्यांचा व्यापार करतात त्या वस्तू बनविणाऱ्यांना पैसा मिळतो. त्याच वेळी देशोदेशीचे पंडित तेथे एकत्र येऊन धर्मशास्त्रावर, तत्त्वज्ञानावर मोठे उद्‌बोधक चर्चासत्र झडते त्यामुळे विद्वानांना आपल्या ज्ञानाची घासूनपुसून वाढ करता येते व शिवाय विद्वज्जनांत वादविवाद करून कीर्ती मिळविता येते. यामुळे विद्वानापासून अडाण्यापर्यंत सर्वांनाच देवालयाचे समारंभ व यात्रा हव्याशा वाटतात. पुष्कळदा देवालयातच पाठशाळा असते. पुन्हा गावातले तंटे बखेडे येथे सोडविले जातात; गावाच्या प्रगतीकरता पाटबंधाऱ्यांपासून मिळणाऱ्या पाण्याचे वाटप तसेच सांडपाण्याचा निचरा कसा करता येईल अशा अनेक विषयांवरील ऊहापोह करण्यासाठी देवालयासारखी उत्तम जागा दुसरी जागा कोणती असणार? देवाच्या सान्निध्यामुळे, देव साक्षी आहे याची सतत जाणीव होत असल्याने तेथील सर्व व्यवहार लांडीलबाडीशिवाय होण्यास मोठीच मदत होते.

भारतात सर्वत्र, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व द्वारकेपासून गोहत्तीपर्यंत अनेक लहानमोठी देवालये तेराव्या शतकापर्यंत होती. तेराव्या शतकात मुसलमानांचा प्रवेश भारतात झाल्यावर त्या सर्वांचा नाश झाला. तरीही विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील प्रदेशातील बरीच देवालये त्यांच्या विध्वंसातून सुटली. त्यामुळे उत्तर हिंदुस्थानापेक्षा दक्षिण भारतातील देवालये बांधण्याची अनेक वर्षांची परंपरा व देवालयांच्या शिल्पपद्धतीत कालानुरूप झालेला बदल यांचा अभ्यास करणे शक्य आहे. त्या काळी उत्तम लाकूड उपलब्ध असल्याने, लाकडावर काम करणे तसेच कोरीव काम करणे, दगडापेक्षा तुलनात्मक दृष्ट्या सोपे असल्याने व लाकडाला उत्तम रंगरोगण केले तर बरीच वर्षे टिकून राहते आणि त्याशिवाय अशा देवालयाचा भपका देखील खूप असू शकतो या कारणानेही पूर्वीच्या काळी लाकडाचा उपयोग देवालय बांधण्यासाठी जास्ती करून होत असे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे चंद्रगुप्त मौर्याचा राजवाडा. त्याच्या दरबारी ग्रीकांचा वकील म्हणून असलेल्या मेगॅस्थेनीस याने या राजवाड्याची मुक्त कण्ठाने स्तुती केली आहे व असा राजवाडा दुनियेत इतरत्र कोठेही अस्तित्वात नाही अशी ग्वाही त्याने दिली आहे. परंतु हा संपूर्ण राजवाडा लाकडाचा बांधलेला असल्याने आजमितीस त्याच्या खांबाच्या पायापाशी जे दगड (तळखडे) बसविले होते त्यांच्याशिवाय त्याचा मागमूसही उरलेला नाही. तीच गत त्या काळी बांधल्या गेलेल्या लाकडी देवालयांची झाली असणार. मात्र याचा अर्थ त्या काळी दगडांनी, विटांनी बांधलेली देवालये नसतीलच असेही म्हणवत नाही. सम्राट अशोकाने अनेक ठिकाणी जे दगडी स्तंभ, लाट उभे केले आहेत त्यांच्या वरून त्याच्याच नव्हे तर त्याच्या पूर्वकाळी देखील दगड घडविणे, दगडाची वास्तू बांधणे, दगडावर उत्कृष्ट नक्षीकाम, मूर्तिकाम करणे, त्याला अगदी गुळगुळीत करून चमकदार (Polish) करणे या सर्व कला भारतीयांना ज्ञात होत्या बात संशय नाही. परंतु ही देवालये मुसलमानांनी पूर्णतः नष्ट केली असावीत. उत्तर हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या वेळेला, रेल्वेकरिता खडी (ballast) पाहिजे म्हणून कित्येक भाजलेल्या विटांनी बांधलेले बुद्धस्तूप नतद्रष्ट्यांनी नष्ट केलेत तशीच गत या जुन्या दगडी देवालयांची, मशीद उभारण्याकरिता झाली असणे अगदी शक्य आहे.

आजमितीस पूजनीय वास्तूंत बुद्ध स्तूपांचा प्राचीनत्वाच्या दृष्टीने पहिला क्रमांक लागतो. अर्थात अनेक उत्तमोत्तम व मोठमोठे स्तूप नष्ट केले गेलेत. मध्यप्रदेशातील सांची येथील स्तूप हे काहीशा बऱ्या अवस्थेत आहेत. बहुतांश सर्व स्तूप धुण्डून काढून इंग्रजांनी खणून काढलेत व त्यातील मूल्यवान वस्तू चोरून नेल्यात. अशा दरवडेखोरीत इंग्रजांचा हात कोणी धरू शकणार नाही. हे स्तूप त्यांना न सापडता व त्याची डागडुजी त्यांनी न करता

तसेच पडून राहिले असते तर त्यांचे नुकसान बरेच कमी झाले असते. भट्टिप्रोलू, अमरावती वगैरे आंध्रप्रदेशातील मोठमोठे स्तूप नष्टप्राय झालेले नाहीत.

स्तूपांनंतर डोंगरात कोरलेल्या लेण्यांचा क्रमांक लागतो. पश्चिम महाराष्ट्रात तसेच दक्षिणेतही नक्षीकाम कोरलेली, मूर्तिकाम व चित्रकाम असलेली अनेक लेणी उपलब्ध झालेली आहेत. भारतात इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापासून इ.स. नवव्या शतकापर्यंत जवळजवळ बाराशे लहान मोठी लेणी खोदली गेलीत. ती एक स्वतंत्र अशी स्थापत्य शास्त्रातील चळवळच भारतात होऊन गेली. काही लेणी फारच भव्य आहेत. पुणे-मुंबई रस्त्यावरील कार्ले येथील चैत्यगृह ३७.७ मी. लांब, १३.७ मी. रुंद व १४.० मी. उंच आहे. वेरूळ येथील कैलास लेण्याची मापे ४६मी. लांब व २७ मी. उंच अशी आहेत. इ.स. पूर्व २०० ते इ.स. २०० या वर्षांत कोरलेली लेणी बौद्धांच्या हीनयान पंथीयांनी कोरलेली आहेत. त्यानंतरच्या काळात प्रथम महायान पंथीय बुद्धजनांनी नंतर ब्राह्मणांनी व त्यानंतर जैनांनी लेणी खोदली आहेत. या तिन्ही पंथीयांनी खोदलेली लेणी वेरूळ येथे आढळतात.

प्रार्थनेसाठी चैत्यगृह व बौद्धभिक्षूंना राहण्यासाठी अनेक वसतिगृहे अशी बहुतेक लेण्यांची रचना असते. चैत्यगृहाचा अधोच्छंद ध्वज प्रकारचा असून मागची बाजू अर्धवर्तुळाकार असते. वरचे छप्पर आतून देखील हस्तिपृष्ठाकृती असते. तेथे दोन्ही बाजूंना खांबांच्या रांगा असतात व अर्धवर्तुळ भागात पुन्कळदा दगडी स्तूप असतो महाराष्ट्रात भाजे, कार्ले, जुन्नर आणि कान्हेरी येथे चैत्यगृहे खोदलेली आहेत. त्यांच्या दरवाजाकडील भिंतीवर असलेले मूर्तिकाम तसेच खांबांच्या बोधिकेवरील नक्षीकाम अप्रतिम आहे. याशिवाय आंध्रप्रदेशात कृष्णा जिल्ह्यात गुण्टुपल्ली लेणी (इ.पूर्व दुसरे शतक) व विशाखापट्टण जिल्ह्यातील शंकरन् लेणी (इ.स. चौथे शतक) ही देखील प्रेक्षणीय आहेत.

अजिंठा येथे जवळ जवळ तीस लेणी आहेत. त्यातील चैत्यगृहे (लेणी क्र. ९ व १०) व बुद्धभिक्षूंची वसतिस्थाने (लेणी क्र. ८,१२,१३ व ३०) ही इ.पू. दुसऱ्या व पहिल्या शतकांतील आहेत. त्यानंतर जवळ जवळ चारशे वर्षांनी लेणीखोदाईच्या चळवळीने पुन्हा उचल खाल्ली आणि पुढील चोवीस लेणी त्या काळी खोदली गेलीत. त्यातील सोळा लेण्यांमधील भित्तिचित्रे अवर्णनीय सुंदर आहेत. मात्र आज फक्त लेणी क्र. १,२,१६ व १७ मधील भित्तिचित्रे काहीशा बऱ्या स्थितीत आहेत. हे चित्रकाम जगातील कोणत्याही भित्तिचित्रांपेक्षा उत्तम दर्जाचे असून त्यातील कलेची सर्वांनीच वाखाणणी केली आहे.

औरंगाबादजवळील वेरूळची लेणी व मुंबई येथील एलिफंटा लेणी ही त्यानंतरच्या काळातील आहेत. वेरूळ येथील हिंदूंनी खोदलेल्या लेण्यांतील मूर्तिकाम उत्कृष्ट आहे व तेथील कैलास लेणे राष्ट्रकूट वंशातील राजा कृष्णराय (पहिला) (इ.स. ७५७-७८३) याने खोदविले व ते लेणे आज जगाला ललामभूत ठरलेले आहे. कैलास लेण्याचे चार प्रमुख भाग पाडता येतात. मुख्य देवालय, पश्चिमेकडे असलेले प्रवेशद्वार, नन्दीसाठी चौकी आणि अंगणाच्या चारीही बाजूंना असलेला वरांडा. देवालय द्राविड शैलीचे असून तीन मजली आहे. त्याच्या शिखराची उंची २८.९मी. आहे. याच्या चारी दिशांना चार(पाच?) लहान देवालये आहेत. म्हणजे हे बहुदा पंचायतन असावे. खुद्द देवालय म्हणजे शिवलिंग असलेले गर्भगृह, त्यानंतर अंतराळमंडप व त्याच्या पुढे सोळा खांब असलेला भव्य महामण्डप आहे. त्याच्यापुढे काही अंतरावर सहा मीटर लांबीरुंदीचा चौरस नंदीमंडप दगडांतून कोरून काढलेला आहे. नन्दीमण्डपाच्या दोन्ही बाजूंना १५.५ मी. उंचीचे दोन ध्वजस्तंभ आहेत.

जुन्यात जुनी, अजूनही टिकून असलेली, इ.पूर्व २५० ची विटा व लाकूड यांनी बांधलेली देवालये जयपूर जवळील बैराट येथे आहेत. त्यानंतर येतात ती गुप्तकालीन (इ.स. ३५० ते ५००) देवालये. ही दगडांनी बांधलेली असून त्यांना शिखर नसते. चार खांबांवर आडव्या तुळ्या व सपाट दगड टाकून व दगडाच्याच भिंती अशी ही देवालये बांधलेली आहेत. त्यांना पुढल्या बाजूला उघडा अर्धमण्डप देखील असतो. खांब घडीव दगडाचे आहेत व त्यांना नक्षी केलेली आहे. झांशी जवळील देवघर येथे एक गुप्तकालीन देवालय आहे. त्याच्या

गर्भगृहावर मात्र लहान शिखर आहे. या काळानंतर अधिक सुंदर, मोठी, नक्षीदार अशी दगडांनी बांधावयास सुरुवात झाली असे सध्या अस्तित्वात असलेल्या देवालयांवरून म्हणता येते.

## पूर्वेकडील राज्यांमधील देवालये

ओरिसा राज्यातील सध्या अस्तित्वात असलेली देवालये इ.स. आठव्या शतकापासून बांधली गेली आहेत. १०व्या व ११व्या शतकांत अनेक उत्तमोत्तम उत्तुंग देवालयांची निर्मिती केली गेली. हे देवालयनिर्माणाचे कार्य १३व्या शतकापर्यंत जोमांत चालू होते. आजपडीला या नागर तऱ्हेच्या देवलयांची गर्दी पुरी, भुवनेश्वर व कोणार्क येथेच फक्त दिसली तरी अशा प्रकारच्या देवालयांची निर्मिती सागरकिनाऱ्यावर दक्षिणेकडे गंजमपर्यंत व उत्तरेकडे बंगाल व बिहारच्या दक्षिण भागापर्यंत केली गेली होती. या प्रकारच्या देवालयांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तेथे सुटे खांब अभावानेच आढळतात. नागर शैलीतील देवालयांप्रमाणे येथे गर्भगृह व मुख्य शाला जिला जगमोहन म्हणतात अशीच मांडणी असते. पण गर्भगृह व मुख्य शाला यांना जोडणारा अंतराळ मण्डप नसतो, तसेच जगमोहन लांबीने गर्भगृहापेक्षाही मोठा असतो. देवालय फार मोठे असेल तर 'नाटमंदिर' व 'भोगमंदिर' असे दोन जास्तीचे मंडप जगमोहन मण्डपाच्या पुढे असतात. या सर्वांचा पूर्व पश्चिम सममितिअक्ष एकत्र असतो. भुवनेश्वर येथील तळ्याच्या काठी एके काळी सात हजार देवालये होती. आज मात्र जेमतेम पाचशेच उरलेली आहेत. सर्वांत जुने व अजूनही व्यवस्थित असलेले देऊळ म्हणजे भुवनेश्वर येथील परशुरामाचे . यानंतर वैताल देवालयाचा क्रमांक लागतो. वैताल देवालयाचा अधोच्छंद आयताकार असून याचे शिखर अर्धगोल ढोलासारखे (barrel vault type) आहे. त्यानंतरचे प्रसिद्ध देऊळ आहे लिंगराजाचे (इ.स. १०००) तसेच राजराणी नावाचे (इ.स. १००-१२५०). पुरी येथील जगन्नाथाच्या देवळाच्या गर्भागारावरील शिखराची उंची ५८.५ मी. आहेत त्यात जगमोहन, नाट व भोगमंदिर हे तीन मण्डप आहेत. यातील भोगमंदिर नंतरचे, कदाचित १४व्या शतकात बांधले गेले आहे, त्याला सोळा खांब आहेत. लिंगराज देवळाप्रमाणे याही देवालयाभोवती ३० ते ४० लहान देवळांची दाटी आहे. पुरीपासून ३२ कि.मी. वर असलेल्या कोणार्क येथील सूर्याचे देवालय गंगवंशीय राजा नरसिंहदेव (पहिला) (१२३८-६४) याच्या कारकिर्दीत बांधले गेले. त्याच्या गर्भगृहाचे शिखर, जे कमीत कमी साठ मी. तरी उंचीचे असावे, पडून गेले आहे. हे देवालय 'रथासह' पद्धतीचे असून त्याला दोन्ही बाजूंना प्रत्येकी तीन मी. व्यासाची १२ चाके आहेत. हा रथ सात घोडे ओढताहेत असे दाखविले आहे. या देवालयाने एकूण २६२.६ मी. लांब व १६४.५ मी. रुंद एवढी जागा व्यापली आहे. याच्या पुढ्यातील नाट मंदिर, ज्याला यूरोपीय देशवासीय काळा पॅगोडा म्हणतात तो मात्र अजून सुस्थित शिखरासह उभा आहे. या सर्व देवालयांवरील नक्षीकाम व मूर्तिकाम उत्कृष्ट प्रतीचे आहे. (लिंगराज देवळाची माहिती मागील लेखात दिली आहे.)

बंगाल राज्यांत एकूण देवळांचे प्रमाण कमी आहे. तेथे जंगलांची वाढ बेसुमार गतीने होत असल्याने अनेक देवालये, ज्यांची बांधबंदिस्ती केली गेली नाही ती, जंगलांनी व्यापून नाहीशी झालीत.

बांकुरा व बरद्वान जिल्ह्यांत ओरिसा शैलीप्रमाणे बांधलेली देवालये आढळून आली आहेत. बांकुरा जिल्ह्यातील देवालयांना मुख्य शाला नाही हे वैशिष्ट्य नमूद करण्यासारखे आहे. बरद्वान जिल्ह्यातच बरकार येथील देवालये १०व्या व ११व्या शतकांतील असून ती बंगालच्या राजांनी बांधलेली आहेत. याशिवाय बैहुलरा गावातील १०व्या शतकांत बांधलेले देऊळ सर्वांत अधिक नक्षीदार आहे. मात्र येथे नक्षी कोरलेली नसून चुन्याचा गिलावा वापरून काढलेली आहे.

दक्षिण बंगालमध्ये विटांनी बांधलेल्या देवळांचा आणखी एक प्रकार आढळतो याचे शिखर झोपडीच्या छपरासारखे असून त्याचे 'गौरीय' प्रकारात वर्गीकरण केलेले आहे. या प्रकारची देवालये बांकुरा जिल्ह्यातील विशनपूर गावी आहेत. ती बहुदा मल्ल राजांच्या काळातील असावीत. तेथील लालगिरी देवालय (इ.स. १६५८) जांभ्या दगडांनी बांधलेले आहे. श्यामराय (इ.स. १६४३) हे विटांचे व मदनगोपाळ (इ.स. १६६५) हे जांभ्या दगडांत बांधलेले आहे. त्यांना प्रत्येकी पाच शिखरे आहेत. (छायाचित्र १)



छायाचित्र - १

बोधगया येथील बुद्ध देवालय फार प्राचीन असून (इ.पूर्व सहावे शतक ?) त्याची उंची ५४.८ मी. आहे. त्याच्याउपपीठाच्या चारी कोपऱ्यांवर मधल्या मुख्य देवालयाच्या प्रतिकृती असे प्रत्येकी एक देवालय नंतर बांधले गेले. देवालयाच्या आवारात अनेक स्तूप असून शिवाय सम्राट अशोकाचा स्तंभ तेथे आहे. त्यावर सिंहमूर्ती आहे. स्तंभाच्या दोन्ही बाजूंवर दोन यक्षांच्या भव्य मूर्ती आहेत.

**मध्य भारत**

खजुराहो येथील देवालयांची माहिती एका स्वतंत्र लेखाद्वारे दिली आहे. भिलसा शहरापासून ६४ कि.मी. अंतरावर उदेपूर गाव आहे. तेथे भूमिज प्रकारचे, सप्तरथ अधोच्छंद असलेले देवालय इ.स. १०५९च्या सुमारास बांधलेले आहे. या देवालयाच्या भिंतींवर अनेक सुंदर कोरीव मूर्ती असून त्याच्या गूढमंडपाचे शिखर संवरणा प्रकारचे आहे. (छायाचित्र २)

ग्वाल्हेर येथील किल्ल्यात तेली-का-मंदिर हे ११व्या शतकांत बांधलेले मंदिर आहे. याचा अधोच्छंद आयताकार असून शिखर ढोलाकार आहे. तरीही याच्या शिखराची उंची बरीच असून नेहमीच्या नागर शैलीपेक्षा काहीसे वेगळ्या प्रकारचे हे मंदिर आहे. येथील 'सास-बहू' ही मंदिरांची जोडी देखील प्रेक्षणीय आहे



छायाचित्र -२

**पश्चिम भारत**

राजस्थानात चौथ्या ते सहाव्या शतकांत, गुप्त राजांच्या कारकीर्दीत, मंदिरनिर्मितीस बरेच प्रोत्साहन मिळाले. परंतु या काळात बांधलेली बहुसंख्य मंदिरे मुसलमानांच्यया मशिदी बांधण्यासाठी नष्ट करण्यात आली. दिल्ली येथील कुतुब मशिदीसाठी २६ देवालये पाडून त्यांचा दगड वापरण्यात आला. अजमेर येथील अढाई-का-झोंपडा या अफगाणांनी बांधलेल्या मशिदीसाठी कमीत कमी ५० देवालये पाडली गेलीत. या मशिदींमधील खांबांवरील नक्षीकाम व मूर्तिकाम यांवरून त्या वेळच्या कलाकारांच्या सौंदर्याभिरुचीची कल्पना येते.

जोधपूरपासून ५८ कि.मी. अंतरावरील ओशिया गावांत हिंदूंची व जैनपंथीयांची मिळून सोळा देवालये खूप पडल्या झडल्या स्वरूपांत आहेत. येथील सूर्याचे देवालय व महावीराचे देवालय (८ वे ते९वे शतक) बघण्यासारखी आहेत. महावीराच्या देवळाला सुरवातीला तोरणद्वार असून मुखमंडप, गूढमंडप व गर्भागार या क्रमाने मंदिराची रचना आहे.

पधारी येथील कोटेश्वराचे मंदिर, उदेपूर येथील उदयेश्वराचे मंदिर व झालारपाटनपासून ८० कि.मी. अंतरावर असलेल्या दामनार गावातील लेणी ही सर्व एकाच काळी (९वे किंवा १०वे शतक) बांधली गेलीत.

उदेपूरहून १९ कि.मी. अंतरावर असलेले बाप्पा रावळ यांनी बांधलेले एकलिंगजी महादेव मंदिर हे आठव्या शतकातील राजस्थानी शिल्पकलेची कल्पना देते. राणाकुंभ याने चितोड येथे १५व्या शतकांत बरीच मंदिरे बांधली. त्यातील विजयस्तंभ राणा कुंभानेच बांधला आहे. सूत्रधार मंडन या प्रसिद्ध स्थपतीने त्यांची निर्मिती केली आहे. नागडा येथील मंदिरे मूर्तिकाम व नक्षीकाम उत्कृष्ट असल्याने प्रसिद्ध आहेत.

दिलवाडा येथे सोलंकी वंशातील राणा भीमदेव याच्या विमल शहा नांवाच्या मंत्र्याने ११व्या शतकांत (इ.स. १०३१-३२) विमल वसही या नावाचे जैन मंदिर बांधले. हे जैन शिल्पकलेचे आद्य मंदिर म्हणावयास हरकत नाही. संपूर्ण देऊळ मकराणा येथील संगमरवरी दगडाने बांधलेले असून त्याची लांबी २९.८ मी. व रुंदी १२.८ मी. आहे. याच्या भोवतीच्या पटांगणाच्या कडेने ५२ लहान देवालये अूसन त्यात तीर्थंकरांच्या मूर्ती बसविल्या आहेत. मुखमंडपाच्या समोरच वेगळा असा एक मंडप असून त्यात हत्तींची रांग आहे.त्यांच्यावर विमल शहा व त्याच्या नातेवाइकांचे पुतळे बसविलेले आहेत. मात्र त्यांची व हत्तींची देखील बरीच पडझड झाली आहे. या देवालयाच्या मंडपावर आठ नक्षीदार खांबांवर तोलून धरलेले अष्टकोनी घुमटाकार शिखर आहे. या घुमटांत दर्दरिका, गजतालू वगैरे एकूण ११ वर्तुळाकार थरविभाग आहेत. हा घुमट आतून व बाहेरूनही अनेक नक्षींनी व मूर्तींनी सुशोभित केला आहे. खांबांना जोडणाऱ्या अनेक प्रकारच्या नक्षीदार तोरणांनी हा उघडा मंडप सजविला आहे. हा मंडप व गर्भागार यांना जोडणारा अंतराल मंडप येथे आहे. संगमवरी दगडांत अनेक मनोहर नक्षी तसेच जैन तीर्थंकरांच्या जीवनातील प्रसंग दर्शविणारे मूर्तिकाम याबद्दल हे मंदिर प्रसिद्ध आहे.

वास्तुपाल आणि तेजपाल हे दोन्ही जैन बंधू वीरधवल महाराजांकडे मंत्री म्हणून काम करीत. त्यांनी अबूच्या डोंगरावर नेमिनाथ तीर्थंकराचे संपूर्ण संगमरवरी दगडातील देवालय बांधले. हे देवालय विमल वसहीनंतर जरी दोनशे वर्षांनंतर बांधले गेले असले तरी त्या जुन्या देवालयाची जवळ जवळ प्रतिकृतीच आहे. या देवालयातील आठ खांब असलेल्या मंडपाच्या घुमटाच्या वितानात जी लोंबती कमळाची कळी कोरली आहे ती एखाद्या स्फटिकाच्या थेंबाप्रमाणे नाजूक व झगमगती आहे. अबूजवळ असलेल्या अशलगड येथील ब्राह्मण व जैन मंदिरे तसेच कुंभारिया येथील जैन मंदिरे याच नागर शैलीतील आहेत.

या शिवाय रामपूर (जिल्हा जोधपूर) येथील चौमुख देवालय हे फारच भव्य व सर्व देवालयांत श्रेष्ठ प्रतीचे आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. येथील शिलालेखांत हे देवालय इ.स. १४३९ मध्ये धरणकी या जैन भक्ताने व देपाक या स्थपतीने बांधले असा उल्लेख आहे. या देवळांत ऋषभदेव म्हणजेच आदिनाथाची मूर्ती असून गर्भागाराला चारही दिशांना दरवाजे आहेत. या देवालयातच आणखी चार लहान गर्भगृहे आहेत. या देवालयात ४०० खांब व

८० घुमट आहेत. यावरून या देवालयाच्या भव्यपणाची कल्पना येऊ शकेल.

गुजराथवर महंमद घझनी याच्या १०२५-२६ मधील स्वाऱ्यांनंतर त्याने जी अनेक देवालये भग्न केली होती त्याचा जणू वचपा म्हणून १३व्या शतकापर्यंत तेथील धनिकांनी सोळंकी वंशीय राजांच्या कारकिर्दीत अनेक देवालये बांधलीत. दुर्दैवाने मुसलमानांच्या धाडी १३व्या शतकानंतर सुरू झाल्यावर ही नव्याने बांधलेली अनेक देवालये पाडून झडून गेली आहेत.

गुजराथेतील नागर देवालयांची, त्यांचे उपपीठ, मंडोवर, शिखर वगैरेंची माहिती मागील लेखांत दिली आहे. मोठेरा येथील सूर्याचे देवालय जरी बरेच पडलेले असले तरी ११व्या ते १३व्या शतकांत बांधलेल्या देवालयांच्या शिल्पशैलीचा चांगला प्रत्यय देते. त्याच्या आठ खांबांनी शिखर तोलून धरलेल्या मंडपातील खांबांची व वितानांची नक्षी केवळ अवर्णनीय आहे. (छायाचित्र ३). शत्रुंजय डोंगरावरील पालिताणा येथे जैनांची लहानमोठी जवळ जवळ ५०० मंदिरे आहेत. यातील आदिनाथ, चौमुख, विमल शहा, कुमारपाल आणि सम्प्रीती राजा ही मंदिरे विशेष उल्लेखनीय आहेत. ही मंदिरे जरी ११व्या शतकात बांधलीत तरी औरंगजेबाच्या कारकिर्दीत त्यांची बरीच नुकसानी झाली. त्यानंतर या मंदिरांची दुरुस्ती १७व्या शतकात झाली. या शिवाय गिरनार डोंगरावर जैनांची अनेक देवालये आहेत. या डोंगराच्या पायथ्याशी अशोक राजाचे आदेश कोरलेले अनेक शिलालेख आहेत. येथील देवालये देखील ११व्या, १२व्या शतकांतील आहेत पण १७व्या शतकात केलेल्या दुरुस्त्यांमुळे त्यांचा चेहरामोहरा बराच बदलून गेला आहे.



छायाचित्र -३

## दक्षिण भारत

दक्षिण हिंदुस्थानातील मंदिरे द्राविड शैलीची आहेत. मात्र त्या शैलीलाही कालपरत्वे अनेक पदर आहेत. दक्षिण भारतात पल्लव (इ.स. ६००-९००), (इ.स. ९००-११५०), पाण्ड्य (इ.स. ११५२-१३५०), विजयनगरचे राजघराणे (इ.स. १३४०-१५६५) व मदुराई येथील नायकराजे (इ.स. १६००-१७००) यांच्या काळात या अनेक उपशैलींच्या देवालयांची निर्मिती झाली.

मद्रासजवळील, ५८ कि.मी. अंतरावर समुद्रकिनारी वसलेल्या महाबलिपुरम् (किंवा माम्मल्लापुरम्) येथे दहा मण्डपाकार लेणी आकाराने लहान आहेत; कोणतेही लेणे ४.५ ते ६.० मी. पेक्षा मोठे नाही. परंतु त्यांच्यातील खांबांचे आकार व नक्षी, वृत्तचितीच्या आकाराचे छाद्य व उत्कृष्ट मूर्तिकाम यामुळे ही लेणी प्रसिद्ध आहेत. दुर्गा व वराह मण्डपांत कुड्यस्तंभ व भिंतींच्या आतील बाजूंवर जे नक्षीकाम व मूर्तिकाम आहे ते पल्लवकालीन शिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. पल्लवकालीन शिल्पे ओळखण्याची एक प्रमुख खूण म्हणजे खांबांच्या खालच्या बाजूला, मागील पायावर बसलेल्या मात्र पुढील जमिनीला टेकलेले पाय ताठ असलेल्या सिंहाची आकृती असते. धर्मराज रथ व अर्जुन रथ हे द्राविड शैलीच्या देवालयांचे उत्तम आद्य नमुने आहेत. धर्मराज रथ पाच व अर्जुनाचा रथ तीन मजली आहे. कूट, कोष्ठादींचे अलंकरण तेथे प्रत्येक मजल्यावर आहे. भीम, गणेश व सहदेव रथ हे आयताकार असून त्यांचे शिखर चैत्यगृहाप्रमाणे ढोलाकार आहे. ते दोन किंवा तीन मजली उंच आहेत. द्रौपदी रथ दगडातील हूबेहूब झोपडी आहे. बहुधा त्या काळाच्या अगोदर लाकडाने बांधलेल्या प्रासादांच्या, या दगडांत कोरलेल्या प्रतिकृती असाव्यात.

त्यानंतर इ.स. ७००-८० मध्ये महाबलिपुरम् येथील समुद्रकिनाऱ्यावरील दगडी देवालय (shore temple) तसेच कांचीपुरम् येथील कैलासनाथ व वैकुण्ठपेरुमल ही देवालये बांधली गेलीत. कांचीपुरम् येथील देवालये पल्लवकालीन द्राविड शैलीचे उत्तम उदाहरणे आहेत. गर्भगृहावर अनेक मजली शिखर, अंतराळमण्डप व नंतर अनेक खांबांनी भूषविलेला (गूढ)मण्डप व या सर्वांभोवती असलेल्या पटांगणाला चारी दिशांना भिंती (प्राकार) ही पल्लव वैशिष्ट्ये आहेत. कैलासनाथ देवालयाच्या भिंतीच्या दरवाजांवर लहानसे गोपुर आहे. ही गोपुरांची सुरुवात म्हणावयाची. वैकुंठ पेरुमल देवालय इ.स. ७८० चे असून त्याच्या शिखराची उंची १८मी. आहे.

चोळवंशीय राजराजा याने इ.स. १०००च्या सुमारास तंजावर येथील बृहदीश्वराचे मंदिर व गंगैकोण्डचोलपम् येथील दुसरे अशी दोन भव्य मंदिरे बांधलीत. बृहदीश्वर मंदिराची माहिती मागे येऊन गेली आहे. कुंभकोणम्पासून २७ कि.मी. अंतरावर गंगैकोण्डचोलापुरम् येथील मंदिर असून ते बृहदीश्वराप्रमाणे उत्तुंग आहे. त्याचा महामण्डप ५३ मी. लांब व २९मी. रुंद असून तेथे १५० खांब आहेत. हजार खांबी मंडपाची सुरुवात या भव्य मण्डपापासून झाली असे म्हणता येते.

पाण्ड्यवंशीय राजांनी देवालये बांधण्यापेक्षा जी देवालये पूर्वीपासूनच प्रसिद्ध होती त्यांना भव्य व उंच गोपुरे बांधणे पसंत केले. श्रीरंगम्, कुंभकोणम्, चिदंबरम्, मदुराई येथील गोपुरे या राजांच्या कारकिर्दीतील (इ.स. ११५०-१३५०) आहेत. गोपुरांविषयी माहिती अगोदर दिली आहे.

१४व्या शतकापासून पुढे १६व्या शतकापर्यंत विजयनगर येथील यादव राजांच्या कारकीर्दीत अनेक देवालये दक्षिण भारतात बांधली गेलीत. ती त्यांच्या भव्यपणाबरोबरच फुलांच्या अनेक देखण्या नक्षींनी प्रसिद्धीस आलीत. त्यांची प्रातिनिधिक म्हणता येतील अशी मंदिरे त्या राजवंशाची राजधानी असलेल्या हम्पी शहरात पहावयास मिळतात. देवालयांच्या प्रांगणात अनेक सुटे मंडप बांधण्याचे तंत्र या काळातच पूर्णावस्थेस गेले. यातील कल्याण मंडप म्हणजे देवाच्या विवाहाचा सोहळा जेथे साजरा करतात, हे अप्रतिम नक्षींमुळे देखणे दिसतात. अनेक मूर्ती असलेले, घोड्याने पुढले दोन पाय उचलून धरलेले व त्यावर स्वार असलेले असे खांब याच काळात निर्माण केले गेले. याशिवाय या काळच्या खांबांच्या बोधिका नक्षीदार व कमळकळीची नक्षी असलेल्या अशा आहेत.

कृष्णदेवरायाने इ.स. १५१३ मध्ये विठ्ठल देवालय बांधले. याचे प्रांगण १५२ मी. लांब व ९४ मी. रुंद आहे व त्याला पूर्व, दक्षिण व उत्तर दिशांकडे तीन गोपुरयुक्त दरवाजे आहेत. विठ्ठल मंदिराच्या गर्भागारावरील शिखर ७.६ मी. उंच आहे. याचे उपपीठ १.५ मी. उंच असून गूढमंडपात ३.६ मी. उंचीचे अत्यंत उत्तम नक्षीकाम व मूर्तिकाम केलेले ५६ खांब आहेत. याच्या पटांगणात सुटा, वेगळा असा ४८ खांबांचा कल्याणमण्डप आहे. याशिवाय एकाच दगडात कोरलेला, शिखराशिवाय असलेला रथ हे या देवालयाचे भूषण आहे.

हम्पी येथेच बांधलेले हझारा राम देवालय देखील प्रसिद्ध आहे. तेही कृष्णदेवरायानेच बांधले आहे. याशिवाय कुंभकोणम्, वेल्लोर, कामेलीपुरम्, तडपत्री, विरींजीपुरम् आणि श्रीरंगम् येथील देवालये याच काळातील आहेत. श्रीरंगम् येथील रंगनाथ देवालयाच्या मंडपातील खांब पुढचे दोन पाय वर केलेले आहेत अशा घोड्यांच्या स्वारांसहित मूर्तींनी सजविलले ` आहेत.



छायाचित्र -४

मदुराई येथील मीनाक्षीचे देवालय हे द्राविड शैलीचे परमरूप होय. येथे दोन देवालये आहेत; एक सुंदरेश्वराचे म्हणजे शंकराचे व दुसरे मीनाक्षीचे. या दोन्ही देवालयांभोवती तीन कोट आहेत. त्यातील देवालयाजवळील पहिल्या कोटाच्या भिंतींची लांबी २५९ मी. व रुंदी २२१ मी. आहे. पूर्वेकडील गोपुर ओलांडून आत गेले की एक अनेक खांबी मार्गिका लागते. त्याच्यापुढे दुसरे गोपुर लागते. अशी गोपुरे इतर दिशांकडील भिंतींत देखिल आहेत. जसजसे आत जाऊ तसतशी गोपुरांची उंची कमी होत जाते. दुसऱ्या प्रांगणात झाकलेला मंडप असून, त्यातून पूर्वेकडील दरवाजातून तिसऱ्या व सगळ्यांत आतल्या प्रांगणात प्रवेश करता येतो. देवालय नेहमीप्रमाणे गर्भगृह, अंतराळ मंडप व गूढ मंडप असलेले आहे. या देवालयाच्या प्रांगणात अनेक मंडप असून त्यांचे खांब अनेक प्रकारच्या नक्षींनी सजविलेले आहेत. यातील दुसऱ्या प्रांगणातील स्वामी सिंगोतनम् नावाच्या मंडपातील खांब फारच भव्य असून त्यातील मूर्तींची मापे नेहमीपेक्षा बरीच मोठी आहेत, तरीही हे मूर्तिकाम प्रमाणबद्ध व सुरुचिपूर्ण झाले आहे. सुंदरेश्वराच्या मंदिराच्या दक्षिणेस मीनाक्षीचे देवालय असून त्याच्या समोरच 'सुवर्णकमळ' तलाव आहे. या देवालयाला एकूण ११ गोपुरे असून त्यातील दक्षिणेकडील सर्वांत बाहेरील गोपुर सर्वांत भव्य व उंच आहे. (उंची ६१मी). या सर्व गोपुरांवर अनेक देवदेवतांच्या मूर्ती आहेत.

दक्षिणेकडील सर्वात मोठा देवालयांचा समूह म्हणजे श्रीरंगम् येथील रंगनाथाचे मंदिर. हे कावेरी नदीच्या दोन फाट्यांमधल्या बेटावर वसले असून त्याला सहा कोट आहेत; व प्रत्येक कोटाला चारी दिशांना गोपुरे आहेत. याच्या सर्वात बाहेरील कोटाच्या भिंतीची लांबी ७५४ मी. व रुंदी ८७८ मी. आहे. चवथ्या प्रांगणातील हजार खांबी मंडप हे शिल्पातील एक आश्चर्यच म्हणावे लागेल. या मंडपाचे सर्व खांब ग्रॅनाईट दगडांचे असून सर्वांवरील नक्षी व मूर्तिकाम अप्रतिम आहे. तिसऱ्या प्रांगणातील गरुड मंडप असाच उत्तम नक्षीदार खांबांनी सजविलेला असून त्याच्या पुढे 'सूर्य पुष्करिणी' नावाचा तलाव आहे. प्रांगणात उत्तरेला 'चंद्र पुष्करिणी' आहे.

सतराव्या शतकात बांधलेल्या रामेश्वर येथील देवालयाभोवती तीन कोट असून सर्वांत बाहेरील कोटाची लांबी व रुंदी अनुक्रमे २६८ मी. व २०५ मी. आहे. त्याच्या भिंतींची उंची ६ मी. आहे. या मंदिराला चार गोपुरे आहेत. या देवालयात १२१९ मी. लांब, दुतर्फा खांब असलेली मार्गिका आहे. हे सर्व खांब ग्रॅनाईट दगडात कोरलेले असून त्यांची २१३ सलग लांबीची रांग अचंबीत करते.

चिदंबरम् येथील नटराजाचे मंदिरही असेच फार प्रेक्षणीय आहे. या अगदीच थोडक्यात दिलेल्या वर्णनापेक्षा तेथे जाऊन ती ती देवालये प्रत्यक्ष पाहणे हाच त्यांचे शिल्प समजण्याचा खरा मार्ग आहे.

याशिवाय विजापूर जिल्ह्यातील पट्टडकल, ऐहोळी व बदामी येथील देवालये बघण्यासारखी आहेत. केवळ ऐहोळी येथेच ७० देवालये आहेत. त्यातील लाडखान व दुर्गा ही देवालये इ.स. ४५०ला बांधली गेलीत. बादामी येथे दगडांत कोरलेली लेणी व दगडांनी बांधलेली चालुक्यकालीन (सुमारे इ.स. ५८०) देवालये आहेत व हे दोन्ही प्रकार प्रेक्षणीय आहेत. पट्टडकल येथे नागर व द्राविड या दोन्ही शैलींची देवालये आहेत. त्यातील पापनाथ(७व्या शतकाच्या शेवटी, संगमेश्वर (सुमारे इ.स. ७२५) व विरूपाक्ष (सुमारे इ.स. ७४०) ही द्राविड शैलीची देवालये चांगल्या स्थितीत असून चालुक्य उपशैलीची प्रतिनिधिक देवालये आहेत.

हसन जिल्ह्यातील बेलूर येथील चेन्नकेशवाचे देवालय व हळेबीड येथील होयसळेश्वराचे देवालय ही दोन्ही त्यांचा मोठा आकार, उत्कृष्ट खोदकाम याबद्दल प्रसिद्ध आहेत. ती इ.स. १११७ साली बांधली गेलीत. केशव देवालयाचे अधिष्ठान ९० सें.मी. उंचीचे असून त्याच्या गर्भगृहावर शिखर नसल्यामुळे ते ठेंगणे वाटते. अनेक सुंदर खांब असलेल्या गूढमंडपाला तीन प्रवेशद्वारे असून त्यांच्या चौकटी उत्तमोत्तम नक्षींनी व द्वारपालांच्या मूर्तींनी सुशोभित केलेल्या आहेत. या देवालयाच्या भिंतींवर अनेक मनोहर मुद्रांमध्ये दाखविलेल्या ३८ स्त्रीमूर्ती आहेत. त्यांना 'मदनिका' म्हणतात. ओरिसा शैलीतील अलसा कन्यांचा हा दक्षिणी अवतार आहे. मात्र त्यांच्या भोवती

असलेली फार सुंदर महिरपीची नक्षी हा या होयसळ शैलीच्या मूर्तीचा विशेष आहे. मंडपांतील भिंती जाळीदार असून त्यांच्यावरील. तेथील खांबांवरील, तुळ्यांवरील व वरच्या वितानांवरील नक्षी इतकी बारीक, वैचित्र्यपूर्ण व दाट आहे की ती बघणारा चक्रावूनच जातो. मण्डपाच्या मध्यभागी असलेल्या चार खांबांवर अनेक दागिन्यांनी नटलेल्या नृत्याच्या मुद्रेत असलेल्या अशा सुंदर मदालसा कोरलेल्या आहेत. याशिवाय येथील काही खांब लेथवर फिरवून त्यांना अनेक वर्तुळाकार आकार दिले आहेत. दोन ते तीन टन वजनाचा दगड लेथवर फिरवून धारदार छिन्नीने त्यांना आकार कसा देत असतील हे अजूनही नवलच आहे.

होयसळेश्वराचे देवालय चेन्नकेशवाच्या देवालयाप्रमाणे होयसळ शैलीचे आहे. मात्र येथे दोन देवालये शेजारी शेजारी असून दोघांना मिळून एकच लांबलचक मंडप आहे. नागर शैलीच्या देवालयाप्रमाणे याच्या अधिष्ठानानचे वरचे थर हे गजथर, अश्वथर व नरथरांचे आहेत.

म्हैसूर शहरापासून ४० कि.मी. अंतरावर असलेल्या सोमनाथपूर येथील तेराव्या शतकात बांधलेले केशवाचे देवालय होयसळ शैलीचे आहे.

धारवाड जिल्ह्यातील तुंगभद्रा नदीवरील चंदमूर गांवातले मुक्तेश्वराचे देवालय, शिवाय लक्कुडी, इट्टगी (गदगपासून ३४ कि.मी. वर) येथे द्राविड शैलीतील देवालये आहेत. पण त्यांची शिल्पशैली काहीशी वेगळी आहे.

## उपसंहार

वरील अनेक शैलींच्या देवालयांशिवाय काश्मीर व केरळ राज्यांतील देवालयांची त्यांचीम्हणून काही वैशिष्ट्ये आहेत, पण त्यांचा ऊहापोह येथे केलेला नाही.

सुजाण वाचक साहजिकच विचारणा करणार की महाराष्ट्रातील देवालये कोणत्या शैलीतील आहेत, ती कोठे व कोणती आहेत, त्यांचा कालानुक्रम काय वगैरे. त्यांच्या विषयीची माहिती दुसऱ्या एका लेखात देणे योग्य ठरेल.

•••

*With Best Compliments From*



**STOP-N-SEE**

**Gifts Collection**

1, Ram Gumpha, Lowar Aali, Chendni, Thane (West).

Tel.: 533 5823

# एकनाथांचे 'रुक्मिणी स्वयंवर'

श्री. श.गो.धोपाटे

दासबोधामध्ये 'महंतलक्षण' या समासात एक निर्देश केला आहे. 'विस्कळीत मात्रा नेमस्त कराव्या। धाट्या, (म्हणजेअक्षराची ठेवण) जाणून सुदृढ धराव्या। रंग राखोन भराव्या। नाना कथा॥'' या आणि अशाच प्रकारची वचने प्राचीन मराठी वाङ्मयात वाचावयास मिळतील. परंतु तशी चित्रकला आपल्याला पहावयास मिळत नाही. जी चित्रे (Miniature Paintings) प्रचारात आहेत ती परप्रांतीय धाटणीची आहेत. पण अगदी योगायोगाने अशा एका पोथीचा सुगावा लागला, तिच्या अभ्यासाची ही गोष्ट. पोथीचे नाव आहे '' संत एकनाथ रचित रुक्मिणी स्वयंवर''.

शुक योगिंद्राप्रति। प्रश्न करी परिक्षिती। भीमकीहरण श्रीपती। काय निमित्ती पै केले॥ ही ओवी योजून एकनाथांनी स्पष्ट केले आहे की भागवतामध्ये रुक्मिणीच्या स्वयंवराची योजना नाही. परंतु भागवताच्या दशम स्कंधातील चोपन्नाव्या अध्यायाच्या त्रेपन्नाव्या श्लोकाच्या ''पुरमानीय विधिवत् उपयेमे कुरूद्वह'' ॥ या ओळीचा आधार घेऊन, रूक्मिणीहरण वार्ता। जुनाट होय सर्वथा। परि पाणिग्रहण व्यवस्था। नवी कथा कवित्वाची॥ असे सांगून स्वयंवर सोहळा कथन करून आपल्या काव्यप्रतिभेची उंची वाचकांच्या समोर उभी केली आहे. अर्थातच संपूर्ण काव्य ''जीवशीव एकात्म म्हणजे भक्तिमार्गाच्या योगाने आत्मबोध'' याने भरून राहिले आहे.

एकनाथांनी ही पोथी चैत्राची (राम) नवमी, शुक्लपक्ष, प्रजापती संवत्सर असता शके १४९३ या काली काशिक्षेत्री गंगेच्या मन्कर्णिका तीर्थावर पूर्ण केल्याचा उल्लेख पोथीतच आहे. पिल्ले एफीमरीच्या आधाराने याची इंग्रजी तारीख ४ एप्रील १५७१ अशी येते व वार बुधवार . परंतु पोथीत नमूद नाही. म्हणजे आज हे काव्य पुरे करून जवळपास ४२५ वर्षे झाली.सश्रद्ध जनतेत तिची गोडी अजूनही टिकून असून वारकरी संप्रदायात तिच्या नित्य पठणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

याचा दुसरा अर्थ असा की ज्यांना ज्यांना आवश्यकता वाटली त्यांनी त्यांनी हिची नक्कल तयार केली. मूळ नाथांचे हस्तलिखित आज उपलब्ध नाहीच, पण जुन्यात जुनी किती वर्षांची पोथी उपलब्ध आहे याची मला कल्पना नाही. बहुधा ही हस्तलिखिते कीर्तनप्रवचनकार यांनी नक्कललेली असावीत. त्याचप्रमाणे या कथेच्या वाचनाने उपवर मुलीना कृष्णासारखा व गुणवान् नवरा मिळतो अशा पारंपारिक समजुतीमुळे राजेरजवाडे यांच्यापासून सर्वसामान्य नागरिकांच्या घरातही ही पोथी आढळून आली आहे.

पुण्याचे एक उद्योजक श्री. बनारसे यांचे आईवडील पाडळकर सरदार यांच्या वाड्यात राहत असताना त्यांनी तेथील दुर्लक्षित वस्तू जतन करून ठेवल्या, त्यांत बरीच पुरातन नाणी व ही पोथी होती. सर्व नाणी माझ्या संग्रहात आली. पोथी मात्र अभ्यासापुरती मला मिळाली. तिच्यासंबंधी मी इथे प्राथमिक निवेदन करीत आहे.

पोथीच्या पानाची लांबी २२ सें.मी. व रुंदी १३ सें.मी. असून अनेकांनी ती हाताळल्यामुळे बऱ्याच ठिकाणी फाटली आहे.

रुंदीच्या बाजूने सध्या बायंडिंग केल्यामुळे पुस्तक या स्वरूपात आहे. पानाच्या चारी बाजूंनी अंदाजे एक ते दीड सें.मी. जागा सोडलेली आहे.

पोथीमध्ये काळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर सोनेरी रंगाने भागवतातील संस्कृत श्लोक देऊन नंतर पांढऱ्या भागावर काळ्या शाईने ओव्या लिहिल्या आहेत. हिचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पोथीच्या पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत प्रसंगानुकूल अत्यंत सुंदर लहान मोठी अनेकरंगी लघुचित्रे (Miniatures)आहेत.

काही ठिकाणी लाल शाईचा उपयोग केला आहे.

त्यांत पृष्ठक्रमांक, अध्यायांचे शेवटचे श्लोक अथवा ओव्या वगैरे आहेत.

एकूण पाने (Pages) ५२८ असून पोथीचे कागद २६४ आहेत. एकूण ओव्यांची संख्या १७०८ असावयास पाहिजे (जय हिंद प्रकाशन मुंबई २, आवृत्ती १९९५) पण हिच्यामध्ये १६९८ चा मेळ येतो. पान ३ गहाळ असून त्यात आठ ओव्या असाव्यात म्हणजे १७०६ चा हिशेब जमतो. दोन ओव्यांचा शोध घेतला नाही.

पृष्ठ क्र. २६ व २८ अध्याय सोळाची दोन पाने संस्कृत असून लाल रंगात आहेत. त्यात शके १६८७ पार्थिव संवत्सर अश्विन वद्य पंचमी गुरूवारी वैदर्भी पाणिग्रहण लेखन "नागसाव्हय" या क्षेत्रामध्ये पूर्ण केल्याचा निर्देश आहे. गुरूवार धरून तिथीचा विचार केला तर ती तृतीया येते पंचमी नाही. इंग्रजी तारीख १७ ऑक्टोबर १७६५ येते. याशिवाय पाचव्या अध्यायांत लेखनकाल जेष्ठ शु ॥ द्वितीया शके १६८६ (शुक्र दि.१ जून १७६४); अकराव्या अध्यायात आषाढ शु ॥ द्वितीया शके १६८६ (शनि-रवि दि. १ जुलै १७६४);

पोथीचे शेवटचे पान फारच महत्त्वाचे आहे. त्यावर लेखकाने स्वतःची तसवीर काढली (अथवा काढवली) आहे. चित्राचे वर "तसवीर नारो गोपीनाथ पुसतकनवीस दीमत सरकार सेनासाहेब सूभा" असा मथळा आहे. सोळाव्या अध्यायात त्याने "साठोपनामके गोपीनाथसुत नारायणेन लिखितं" असा स्वतःचा निर्देश केला आहे.

नागसाव्हय क्षेत्र म्हणजे सध्याचे नागझरी क्षेत्र या ठिकाणी प्राचीन असे शिवमंदिर असून ते विदर्भातील सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून आजही विख्यात आहे. ज्यांच्या पदरी हे नारो गोपीनाथ पुस्तकनिर्मितीच्या खात्यावर प्रमुख म्हणून नियुक्त होते ते "सरकार सेनासाहेब सरसुबा" म्हणजे नागपूरकर भोसले. नागपूरकर भोसल्यांनी पूर्वेकडे केलेल्या पराक्रमावर खूष होऊन पहिले शाहू छत्रपति यांनी ही किताबत त्याना दिली होती. जो पोथीचा काळ म्हणजे सन १७६५ मध्ये नागपूरला त्यावेळी जानोजी भोसले (सन १७५३ ते १७७२) राज्यावर होते. म्हणजे नारो गोपीनाथ 'पुस्तकनिर्मितिप्रमुख' जानोजी राजांच्या पदरी होते.

चित्रशैलीला Maratha Miniatures म्हणावयास काहीच प्रत्यवाय नसावा. स्त्रियांची वस्त्रप्रावरणे नेसण्याची पद्धत अस्सल महाराष्ट्रीय जाणवते. कपाळावरील कुंकवाची आडवी कपाळभर चीर हेही महाराष्ट्रीय वैशिष्ट्य. पुरुषांची कानटोपी, नेसूचे धोतर, पगडी, उपरणी महाराष्ट्रीय होत. परंतु ज्या शैलीला पश्चिमी चित्रशैली म्हटले जाते व विशेषतः राजस्थानी, तिचाही प्रभाव निश्चित जाणवतो. जरासंध यावनी पोषाखात दिसतो. सैनिकांचा गणवेश, मिरवणुकीतील नर्तकी राजस्थानी, वाटतात. वाडे, घरेदारे, खिडक्या पेशवाई काळ उभा करतात. मराठा चित्रशैलीसंबंधात डॉ. कमल चव्हाण यांनी घेतलेला मागोवा (सकाळ दि. १७-८-१९९७ पुरवणी) या चित्रांनाही चपलख बसतो. परंतु त्यांनी भित्तिचित्रांवर (Frescos) अधिक भर दिलेला असून कागदावरील चित्रे आणि लघुचित्रे वाङ्मयीन संदर्भाने वर्णन केली आहेत. तसेच रमेश आवलगावकर यानी बोरा महाविद्यालयातील चित्रसंग्रहाचा दिलेला आढावा लक्षात घेता (महाराष्ट्र टाइम्स २९-१०-१९८९ पुरवणी) या लघुचित्रांचे दुर्मिळत्व लगेच लक्षात येते. एम्.आर. मुजुमदार यानी गुजराती चित्रशैलीवर (Journal of University of Bombay Vol. VI Part VI page 123) विस्तृत लेख लिहून पश्चिमी शैलीच्या संदर्भात तिचे वैशिष्ट्य अभ्यासकांच्या पुढे आणले. दक्षिणी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या शैलीतील A Damsel, (SZ.No. 678) Trivikram (S.No. 8715), Ragashri(S.No. 10675) वगैरे चित्रे बहुतांशी उत्तर भारतीय प्रभावाची वाटतात, मूळ चित्रे विजापूर, हैद्राबाद आदी ठिकाणांहून मिळवलेली आहेत म्हणून दक्षिणी. बहुतेक चित्रे, सतरा ते एकोणिसाव्या शतकातील आहेत. नुकताच या आर्ट गॅलरीला भेट देण्याचा योग आला असता, निवृत्त निर्देशक डॉ. आनंदकृष्ण "रुक्मिणीचे पत्रलेखन" हे चित्र पाहून फारच प्रभावित झाले.

पुढील दोन्ही चित्रे अस्सल मराठी चित्रशैलीची प्रतीकेच आहेत हे निर्विवाद.



लग्न होऊन गृहप्रवेश झाल्यानंतर सोयऱ्या सख्यांच्या समवेत रूक्मिणी. बलरामाची पत्नी रेवती, रुक्मिणीची वडील जाऊ कुल आणि कुलाचाराच्या चार गोष्टी सांगत आहे.



कृष्णाशी लग्न करण्याच्या मानसाला तिचा बंधू रुक्मि याने विरोध दर्शविल्यावर गुप्तपणे विवाह करण्याविषयी कृष्णास पत्र लिहिताना रुक्मिणी.

आधीच सांगितल्याप्रमाणे पोथी अत्यंत जीर्ण आणि हाताळण्यास कठीण. तरीही बाइंडिंग केलेल्या अवस्थेतसुद्धा परिश्रमपूर्वक सर्वच्या सर्व एकशे पंचवीस चित्रांचे फोटोग्राफ्स घेऊन त्यावरून स्लाईड्स तयार केल्या आहेत. चित्रांमध्ये जे काही दोष आले आहेत ते असे.

१) बाइंडिंगमुळे फोटो घेताना पाने प्रयत्नपूर्वक एका पातळीत आणून फोकस संपूर्ण चित्रावर साधणे कठीण झाले. छोटी चित्रे व पहिली आणि शेवटची चित्रे चांगली आली.

२) कागद पिवळा आणि काही ठिकाणी फाटलेला असल्यामुळे पूर्ण चित्रे मिळाली नाहीत.

चित्रकार नारो गोपीनाथच असावा का ? पोथीमध्ये तेराव्या अध्यायात ५३ व्या ओवीनंतर आणि अध्याय बाराव्यात ५५ व्या ओवीनंतर दोन चित्रे स्वयंवरसंबंधी नसून, उगाच घुसडली आहेत. चित्रे वैशिष्ट्यपूर्ण आहेत आणि लेखन करता करता काढलेली दिसतात. ही नारो गोपीनाथाच्या हातची असावीत. व त्या अनुषंगाने चित्रेही त्यानेच चितारली असावीत व शेवटचे स्वतःचे चित्र

(पान क्र. ३९ वर)

# चक्रव्यूह

प्रा. य.भ. भिडे

महाभारतामध्ये अर्जुनाचा मुलगा अभिमन्यू सैन्याच्या चक्रव्यूहामध्ये शिरला आणि मारला गेला. तसा चक्रव्यूह भेदायचा कसा हे अर्जुनाला माहीत होतं, अभिमन्यूला चक्रव्यूहात शिरायचं कसं हे ज्ञात होतं, परंतु तो भेदून बाहेर कसं यायचं ह्यात तो अनभिज्ञ होता आणि म्हणून त्याचा पराभव आणि मृत्यू.

आम्हीही अशा प्रकारचे चक्रव्यूह तयार केले आहेत, त्यात मोठ्या आनंदाने शिरलो आहोत आणि त्यातून बाहेर कसे यायचे ह्याबद्दल अनभिज्ञ आहोत. की आम्हाला त्या चक्रव्यूहांतून बाहेरच यायचं नाही ?

खालील आकृती क्र. १ बघा :-




आकृती क्र.१ व्यक्ती आणि जग

मी आणि आपण सर्वजण एक व्यक्ती म्हणून एका कुटुंबाचे घटक आहोत. अशी अनेक कुटुंबे मिळून एक समाज बनतो. मग त्याला आपलं गाव म्हणू या, ज्ञाती म्हणू या, सहकारी गृह वसाहत किंवा एखाद्या मोठ्या शहराचे एक उपनगर म्हणू या.


अशाच छोट्या समाजांचा मिळून एक मोठा समाज बनतो. त्याला आपण मोठं शहर, प्रादेशिक राज्य किंवा राष्ट्र म्हणू शकतो.

अशी अनेक राष्ट्रं जगाचा भाग असतात आणि आपलं जग हे ह्या विश्वाचा एक भाग आहे.

व्यक्ती म्हणून आपण ह्या आकृतीच्या अगदी आत आहोत. आपण चक्रव्यूहाच्या मध्यभागी आहोत.

आम्ही स्वतःला बजावत असतो, "मी फक्त एक व्यक्ती आहे, मी हतबल आहे. मी ह्या जगासाठी, ह्या विश्वासाठी काय करू शकणार ? मी ह्या चक्रव्यूहात अडकलो आहे. मला ह्यातून बाहेर पडता येणार नाही. मी तसा प्रयत्न केला तर हकनाक मारला जाईन.

आकृती क्र. २ बघू या




आकृती क्र.२ हतबल व्यवस्थापक


मी एक व्यवस्थापक म्हणून एखाद्या कंपनीमध्ये काम करीत असेन. मी जे काम करीत असेन, त्याला माझ्या कंपनीच्या परिस्थितीच्या मर्यादा आहेत. माझी कंपनी वस्त्रोद्योगामध्ये कार्यरत असेल तर कदाचित् त्या उद्योगाची परिस्थिती, माझ्या कंपनीचे भविष्य किंवा सध्याची परिस्थिती ठरवील.वस्त्रोद्योगाचे भवितव्य घडविण्यात देशातील व्यावसायिक वातावरण मोठा वाटा उचलते. ह्या व्यावसायिक वातावरणामध्ये सरकारची धोरणे, बदलते तंत्रज्ञान, आर्थिक परिस्थिती, राजकीय वातावरण, समाजकारण आणि सांस्कृतिक परिस्थिती आदींचा सहभाग असेल आणि देशातील व्यावसायिक वातावरण हे सबंध जगाच्या व्यावसायिक वातावरणाचा एक भाग असल्याने सर्व जगभर होणाऱ्या बदलांचा परिणाम माझ्या देशाच्या

व्यावसायिक वातावरणावर व तात्पर्याने माझ्या वस्त्रोद्योगावर, माझ्या कंपनीवर व माझ्यावर होणार आहे.

आता आम्हाला हे सगळं अगदी सोपं झालं. माझ्या कंपनीमध्ये मी काहीही करू शकत नाही कारण त्या कंपनीमध्ये मी फक्त एक व्यवस्थापक आहे. माझी कंपनी तिची स्थिती बदलण्यासाठी काहीही करू शकणार नाही, कारण ती ज्या उद्योगात आहे, उदा. वस्त्रोद्योग, तोच डबघाईला आलेला आहे. तो वस्त्रोद्योग ऊर्जितावस्थेला येण्यासाठी काहीही करण्यास असमर्थ आहे कारण एकूणच राष्ट्रीय वातावरण सहाय्यभूत होणारं नाही. आणि अगदी आमचे अर्थमंत्री, उद्योग खात्याचे मंत्री किंवा देशाचे पंतप्रधानही म्हणू शकतील की देशाची आर्थिक स्थिती सुधारणं शक्य नाही, कारण आंतरराष्ट्रीय परिस्थिती चांगली किंवा उपकारक, हितकारक नाही.

म्हणजे आहे की नाही -''ठेविले अनंते तैसेची रहावे'' सारखी परिस्थिती ? आहे की नाही अभेद्य चक्रव्यूह ? आहेत की नाही सर्व व्यावसायिक, धुरंधर राजकारणी आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नेते परिस्थितीचे गुलाम ? चक्रव्यूहात मारले जाणारे अभिमन्यू ?

आकृती ३ निरखू या-




आकृती क्र.३ : महाविद्यालयीन शिक्षक-सामाजिक बदलांचे अग्रदूत की परिस्थितीचे बंदिवान ?

आमचा महाविद्यालयीन शिक्षक बघा. तो एखाद्या महाविद्यालयाचा भाग आहे, आणि तो काय करतो, करू शकतो हे त्या महाविद्यालयाचे विद्यार्थी, इतर शिक्षक, व्यवस्थापन, प्राचार्य ह्यांच्यावर अवलंबून आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्यांना किंवा संस्थाचालकांना विचारा. ते महाविद्यालयाची हलाखीची परिस्थिती, घसरती गुणवत्ता आदी सगळ्यांचे खापर विद्यापीठ, राज्यसरकार, पालक, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थी संघटना आदी सगळ्यांवर फोडू शकतील. विद्यापीठाच्या कुलगुरू वा उपकुलगुरूंना विचारा, असेच दोषारोपांचे बोट वर व इतरत्र दाखविले जाईल. मग ह्या सगळ्यांना जबाबदार कोण ? ही परिस्थिती सुधारणार कशी ? कोण होणार येणाऱ्या बदलांचे, क्रांतीचे अग्रदूत ? की सर्वच मारले गेलेले, मारले जाणारे अभिमन्यू ?

ह्या सगळ्यांचं उत्तर शोधताना माझ्या मदतीला आला निसर्ग. माझ्या गावाच्या नदीवर एका संध्याकाळी गेलो. संध्याकाळची वेळ. शांत वातावरण, उंच उंच झाडं, त्यांची सळसळ, घरट्यांकडे परत येणारे पक्षी, मावळता सूर्य ह्यांच्या साथीने नदीच्या डोहाजवळ असणाऱ्या खडकावर बसलो. इथूनच लहानपणी आम्ही नदीत पोहण्यासाठी उडी मारायचो.

मन शांत होतं. शरीर स्वस्थ होतं. निसर्गाशी एकरूप होण्याशिवायय इतर काही काम नव्हतं. आणि म्हणून काहीतरी करायचं म्हणून मी बसलो होतो तिथलाच एक खडा उचलला आणि पाण्यात टाकला. झालेला आवाज आवडला आणि पाण्यावर एक वर्तुळ तयार झालं, आणि आकाराने वाढत, पसरत जाऊन नंतर दिसेनासं झालं मी दुसरा खडा, तिसरा खडा, चौथा खडा असे खडे एकाच जागी किंवा तिथेच जवळपास पाण्यात टाकत राहिलो. तोच खड्याच्या पाण्यात पडतानाचा आवाज आणि तशीच वर्तुळं, काही एकमेकात सामावून जाणारी. जणू आपल्या समाजव्यवस्थेचं प्रतिबिंबच. व्यवस्थापनशास्त्रातल्या सिस्टिम्सचे (Systems) प्रतिरूप.

मी पुन्हा एक खडा उचलला व पाण्यात टाकला. एक वर्तुळ निर्माण झालं. मी दुसरा खडा उचलला आणि आधीच्याच जागी जरा जास्त जोराने टाकला. पुन्हा वर्तुळ निर्माण झालं. पण हे वर्तुळ जास्त वेगानं वाढत गेलं आणि थोड्याच वेळात आधीच्या वर्तुळाला भेदून, त्याच्यापेक्षा

मोठं होऊन त्याला गिळंकृत करून वाढत गेलं.

आणि ... आणि उत्तर सापडलं, आतलं वर्तुळ बाहेरच्या वर्तुळाला भेदू शकतं. त्याच्याहून मोठं होऊ शकतं.

आम्ही चक्रव्यूह भेदू शकतो. परिस्थितीबाबत रडण्यासाठी आमचा जन्म झालेला नाही. परिस्थिती बदलण्यासाठी, तिच्यावर मात करण्यासाठी आम्ही आहोत. ईश्वराने आम्हाला त्यासाठीच पाठवलं आहे.

मग आम्ही शिक्षक असू, व्यवस्थापक असू, एका कुटुंबाचे घटक असू, सरकारी अधिकारी असू, राजकारणी असू, कोणीही असलो तरी परिस्थितीचे सुकाणू आम्ही आमच्या हाती घेऊन परिस्थिती बदलू शकतो. निदान तसा प्रयत्न तरी करू शकतो, हेच जणू ती पाण्याची वर्तुळं मला सांगत होती.

नदीवरून घरी परत येत असताना व त्यानंतरही मी माझ्या मनात आलेले विचार सत्य परिस्थितीशी ताडून पाहत आलो आहे. दुर्दैवी अभिमन्यूऐवजी जगातले अर्जुन शोधायला लागलो. ते मला इतिहासातही दिसले आणि म्हणूनच ह्या देशाला, ह्या जगाला चांगलं भविष्य आहे.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।

अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानम् सृजाम्यहम् ॥

हे श्रीकृष्णाचं अर्जुनाला सांगणंही तेच सांगतं. जेव्हा जेव्हा परिस्थिती अतिशय हलाखीची असेल, दैन्यावस्थेची असेल, सत्याच्या व धर्माच्या गुलामगिरीची असेल तेव्हा तेव्हा श्रीकृष्ण जन्माला येतात. हे एक श्रीकृष्ण असतील किंवा अनेक असतील.

लहान वयात ज्ञानेश्वरी सांगणारे ज्ञानेश्वर काय सांगतात ? यवनी साम्राज्य व गुलामगिरीचा विळखा घट्ट आवळलेला असताना स्वराज्याचा ध्यास घेणारे वा ते सत्यात उतरवणारे शिवाजीराजे आणि त्यांचे जिवलग सरदार काय दर्शवितात ? आमच्या स्वातंत्र्यसंग्रामात तेजाळून गेलेले लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर, हेही आपल्याला, प्रवाहपतित होऊ नका, प्रवाहाला वळविणारे व्हा असंच सांगताहेत ना ? राजा राममोहन राय, महात्मा फुले, आगरकर, धोंडो केशव कर्वे आदींना सामाजिक परिवर्तन करताना प्रवाहाविरुद्ध पोहायला लागलं नाही ? त्यांनी या देशाच्या समाजकारणाच्या प्रवाहाला वळण लावलं नाही ?

औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्र घ्या. अमेरिकेतील क्रायस्लर कॉर्पोरेशनचे नाव आपण सगळ्यांनीच ऐकलं असेल. अमेरिकेतील व जगातील मोटारी बनविणाऱ्या मोठ्या कारखान्यांपैकी एक. ही कंपनी डबघाईला आली. तोट्यात गेली. आजारी झाली. अशा वेळी ली इयाकोका(Lee Iacoca) ह्यांनी क्रायस्लर कॉर्पोरेशनचा प्रमुख म्हणून सूत्रे हातात घेतली. ती कंपनी किती गंभीररीत्या बुडत होती ह्याचं वर्णन करताना (Lee Iacoca - An Autobiography) इयाकोकांनी लिहिले आहे की एका रेस्टॉरंट मालकाने त्यांनी सँडविचेस व कॉफी मागिवली असता "आधी पैसे द्या मग मागविलेल्या वस्तू पाठवतो" असे फर्मावले.

कंपनीची परिस्थिती अशी डबघाईला आलेली असताना तिला सावरणं किती कठीण असेल ? परंतु इयाकोका गडबडले नाहीत, प्रवाहपतित झाले नाहीत, परिस्थितीपासून दूर पळाले नाहीत. त्यांनी सगळ्यांना एकत्र करून, सगळ्यांचं सहाय्य घेऊन, सर्वांनी मिळून अपार कष्ट करून क्रायस्लर कॉर्पोरेशन पुन्हा एक यशस्वी भरभराटलेली औद्योगिक संस्था म्हणून उभी केली. क्रायस्लर उभी राहिल्याने बँकांचे पैसे, सरकारचे करांपासून उत्पन्न, कामगार व स्वयंरोजगार करणारे उद्योजक आणि तिच्या उत्पादनाच्या ग्राहकांचे होणारे नुकसान वाचले. क्रायस्लरने भाग भांडवल देणाऱ्यांना भरघोस नफा दिला आणि देशाला जपानच्या मोटारउद्योगधंद्यापासून होणाऱ्या स्पर्धेपासून वाचविले.

आपल्या औद्योगिक व्यापारी वित्तव्यवस्थापनातील कंपन्या ह्यांच्यामध्येही अशीच उदाहरणं दिसतील. इतर सर्व जण परिस्थितीवर रडत असताना ह्यांनी आपले उद्योग

भरभराटीला आणलेले दिसतात. टाटा, रिलायन्स, लार्सेन टुब्रो, किर्लोस्कर, वालचंद हिराचंद, युनिट ट्रस्ट ह्यांसारखे उद्योगसमूह काय दाखवितात ? गेल्या दहापंधरा वर्षांत कित्येक नव्या क्षेत्रात वा नवे उद्योग उभारणारे भारतीय उद्योजक. उदा. सॉफ्टवेअर कन्सलटंटस्, नॉनबॅंकिंग फायनान्स कंपन्या, कोरियर कंपन्या, खाद्यपदार्थ बनविणाऱ्या कंपन्या किंवा अगदी STD बूथ चालविणारे उद्योजक हेच सिद्ध करतात. ''परिस्थितीपुढे हार मानू नका, सध्याच्या परिस्थितीत संधी शोधा व परिस्थितीवर मात करा'' हाच संदेश आहे.

एक व्यक्ती म्हणूनही लोकशाही व्यवस्था असलेल्या ह्या देशात आपण खूप काही करू शकतो. आधी आपण स्वतःला आपले स्वतःचे कुटुंब व आपला छोटा परिवार ह्यांना नक्कीच सांभाळून चांगली करूं शकतो. 'वनराई'चे मोहन धारिया, राळेगणसिद्धीचे अण्णा हजारे, स्वाध्याय परिवाराचे पांडुरंगशास्त्री आठवले ह्यांच्या सारखं होता आले नाही तरी त्यांच्या कार्याचा थोडाफार भार तर आपण वाहूं शकतो ? आणि अशी कामं करता करताच आपले व्यक्तिमत्त्व, आपले आंतरिक सामर्थ्य फुलून वर येईल आणि आम्हीही त्यांच्यासारखं किंवा त्यांच्यापेक्षाही मोठं काम करून दाखवू शकू. आपण प्रत्येकाने असं स्वतःला, आपल्या छोट्या कुटुंबाला, आपल्या लहानशा समाजाला वा एका लोकहितकारी संस्थेला नीट सांभाळले तर देशाची परिस्थिती नक्कीच सुधारेल. कोण जाणे कदाचित आपल्यापैकी अनेकजण नव्या युगाचे पाईक होतील. तसेच आपल्या व्यक्तिगत आयुष्यात आपले आईवडील गरीब आहेत, अडाणी आहेत, घरांमध्ये दुःख, दारिद्र्य, भांडणं आहेत म्हणून आपण रडत बसणार का ? की आपण प्रत्येकाने आपल्या कुटुंबाची दोरी हातात घेऊन स्वकर्तृत्वाने आपले कुटुंब, त्याची अवस्था सुधारण्याचा प्रयत्न करायला हवां ? आजूबाजूला पाहिल्यास असे हजारोनी तरुण मुलं, मुली, बायका, पुरुष दिसतील की ज्यांनी आपली घरं, आपली कुटुंब सुधारलेली आहेत, सुस्थितीला आणली आहेत.

असाच विचार आम्ही सर्व शिक्षकांनीही करण्यासारखं आहे. आजची शिक्षणाची दुरवस्था ही काय काही न केल्याने दूर होणार आहे ? ती सुधारण्याचा प्रयत्न शिक्षणक्षेत्रातील माणसांनी नाही करायचा तर मग कोणी करायचा ? ते भारताची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचं काम अमेरिकेला सांगण्यासारखं आहे. जशी नव्या भारताची उभारणी भारतीयांनीच करायची आहे. ती अमेरिकेने करायची कल्पना आपल्याला मान्य होणार नाही. तशीच शिक्षणक्षेत्रातील नव्या युगाची सुरुवात प्रामुख्याने शिक्षकांनीच करायला हवी असं म्हणावसं वाटतं. शिक्षण क्षेत्रातील नवी आव्हाने व नव्या संधी ह्यांना सामोरे जाणे हे ह्या देशाचे शिक्षक करू शकतात. फक्त त्यासाठी त्यांनी प्रवाहाला नवे वळण द्यायचं ठरवायला हवं. मग अशा शिक्षकांतूनच उद्याचे शिक्षणमहर्षी तयार होतील. इतकंच नाही तर नवा देश व नवे जग घडविणारे ते शिल्पकार होतील.

आपण व्यक्ती म्हणून, व्यवस्थापक म्हणून किंवा शिक्षक म्हणून चक्रव्यूहात मारले जाणारे अभिमन्यू आहोत की चक्रव्यूह भेदणारे अर्जुन आहोत ह्याचा विचार आपण प्रत्येकानेच करावयाचा आहे. आपण कुठल्याही क्षेत्रात असा उदा. सरकारी यंत्रणा, वैद्यकीय व्यवसाय, शेती, कायद्याचं क्षेत्र इ. आपल्या क्षेत्रात असे चक्रव्यूह आहेतच आणि ते भेदण्याची क्षमताही आपल्यात आहे. आपण ती आपली ताकद, आपलं सामर्थ्य ओळखूं या आणि नवं आशादायी वातावरण निर्माण करू या असं विनवावंसं वाटतं.

एक धोक्याची सूचनाही लक्षात घ्यावी. एक व्यक्ती, एक शिक्षक, एक व्यवस्थापक, एक व्यावसायिक, एक राजकारणी, आपण कोणीही असलो तरी अशी परिस्थिती बदलून चांगली करू शकतो. तशी ती अधिक वाईट, दाहक, दुःखदायकही करू शकतो. आपण जसं एक घर बांधू शकतो तसं एक घर जमीनदोस्तही करू शकतो. आपलं सामर्थ्य चांगल्यासाठी वापरू या. नवं आशादायी जग निर्माण करायला वापरू या. त्याची परिस्थिती आणखी नाजूक करण्यासाठी नव्हे. जहाज तरुदे, जहाज डुबू नये. देव अपल्याला अशी इच्छा व सामर्थ्य देवो हीच ईशचरणी प्रार्थना.

• • •

# वाचन व ग्रंथालये

**श्री.विश्वनाथ शेंडे**

वाचन हा शब्द वच् (बोलणे) या धातूच्या प्रयोजक रूपावरून साधलेले क्रियावाचक नाम होय. थोडक्यात वृक्षांच्या साली, कागद या लिखाणाच्या साधनांवर लिहिलेल्या मजकुराला बोलते करणे. डोळ्यांच्या सहाय्याने किंवा अंधांच्या बाबतीत हाताच्या सहाय्याने लिखित मजकूर आकलन करणे व पुढे मनन, चिंतन, स्मृती, इत्यादींच्या सहाय्याने आत्मसात करणे हे वाचनाचे उद्दिष्ट होय.

१) मनोरंजन २) ज्ञान

**मनोरंजन :**

अगदी लहानपणापासून मुलाचा वाचनाशी संबंध येतो. मूल अगदी लहान असते तेव्हा त्याच्यापुढे चित्रांचे, विशेषतः प्राणी, फळे आदी चित्रांचे तक्ते ठेवले जातात. व मूल ती चित्रे पाहून हत्ती, घोडा, मगर आदी प्राणी ओळखू लागते व त्याचे मनोरंजन होते.

मूल थोडे मोठे झाल्यावर शाळेत प्रथमतः अंकलिपी दिली जाते. यावरून ते मुळाक्षरे, आकडे वाचू लागते व आपल्याला वाचता येते याचा आनंद उपभोगू लागते.

या मौजेच्या काळात मनोरंजन व ज्ञान या दोन्ही गोष्टी एकरूपच असतात. वाचता येऊ लागणे ही मुलाच्या आनंदाची व अभिमानाची गोष्ट असते, व या भरात त्यास अधिक वाचण्याची उमेद व हौस वाटते. ज्या वेळी प्रौढ लोक साक्षर होण्याचा प्रयत्न करतात तेव्हा वरील गोष्टी आपणांस सहज लक्षात येतात. प्रौढ साक्षरतेचे वर्ग चालविणाऱ्यांना हा बालपणा विशेष लक्षात येतो.

नव्या नव्या गोष्टी शिकणे हा सुद्धा मनोरंजनाचाच भाग आहे. परीक्षेसाठी बौद्धिक ताण घेऊन केलेले वाचन व मोकळा वेळ असताना केलेले सहज वाचन यांत मुख्य फरक मनोरंजनाचाच आहे.

बालपणापासून अशी मनोरंजक वाचनाची सवय लागल्यास व पुढे वाढविल्यास शेवटपर्यंत माणसाला मनोरंजनाच्या अन्य साधनांची जरूरी भासत नाही. आजपर्यंत जे मोठे ग्रंथकार होऊन गेले ते जबर वाचणारे होते असे दिसते. बुद्धी केवढीही उज्ज्वल असली तरी, ज्याप्रमाणे हिऱ्यावर संस्कार केले नाहीत तर त्याचे तेज प्रकट होत नाही, त्याप्रमाणे बुद्धीवर वाचनाचा संस्कार झाला नाही तर ती गंजलेली राहील, व बुद्धीचे तेज कधीच प्रकट होणार नाही.

वाचनाने काळ उत्तम रीतीने घालविता येतो. ज्ञान व मनोरंजन हे दोन्ही हेतू वाचनाने साध्य होतात. विद्वान लोक व इतर लोक यांच्या वेळ घालविण्याच्या पद्धतीसंबंधात एक संस्कृत सुभाषित आहे ते मननीय आहे.

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।

व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥

बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य किंवा शास्त्र यांच्या अध्ययनात किंवा विनोद, मनोरंजन यांत जातो, तर मूर्ख लोक आपला वेळ व्यसनात, निद्रेत अथवा भांडणतंडण करण्यात घालवितात. जगात दुसऱ्या प्रकारच्या लोकांचाच अधिक भरणा आढळतो.

भर्तृहरीने एके ठिकाणी म्हटले आहे:-

सुकविता यद्यस्ति राज्येन किम् ।

उत्कृष्ट कवितेपुढे राज्याची काय महती ? खरा रसिक व विद्वान हा आपल्या पुस्तकालयात ग्रंथवाचनात गुंगून गेल्यावर त्याला जे सुख होईल ते सार्वभौम राजालाही दरबारात बसून होणार नाही. अत्यंत शुद्ध प्रतिष्ठादायक व मनोरंजनावह असे करमणुकीचे साधन, वाचन हेच होय.

**ज्ञान :**

ज्ञान संपादन करण्याचे मोठे साधन म्हणजे ग्रंथवाचन. सिसेरोने म्हटले आहे की "लेखनकला जर नसती तर मुळारंभी जगाची अथवा मानवजातीची जी स्थिती होती तीमध्ये पुढे पाऊलच पडले नसते." मुद्रणकलेमुळे ज्ञानाची सर्व साधने तुमच्यापुढे हात जोडून उभी आहेत. विद्येच्या अनेक शाखांवर ग्रंथ तयार होत

आहेत. ज्ञानसंपत्तीचे भांडार मागे पडत चालले आहे. गुरुशिष्यपरंपरा मागे पडत चालली आहे व ग्रंथ हेच खऱ्या अर्थाने गुरू बनत चालले आहेत. आज गंभीर विषयांवर गंभीर ग्रंथ उपलब्ध होत आहेत तर करमणुकीसाठी ललित कथा, कादंबऱ्या, काव्य यांचा वाचकवर्ग तयार होत आहे.

वाचनाने माणसाचे मन विशाल, बहुश्रुत होते. पूर्वग्रह, दूषित विचार, चुकीच्या कल्पना यांना दूर ठेवले जाते, व सुविचार, सदसद्विवेक, सारासार विचार करण्याची माणसाला संवय लागते. वाचनाने ज्ञान वाढते व अज्ञानाचा अंधकार दूर होण्यास मदत होते. ज्ञानदीपाच्या प्रकाशात सामाजिक उत्कर्षाच्या दिशा अधिक उजळ होतात.

आजच्या जगात प्रत्येक सुशिक्षित माणूस नियमाने काय वाचतो, तर वर्तमानपत्रे व मासिके. वर्तमानपत्रांनी सकाळच्या चहाच्या प्याल्याबरोबरचे स्थान पटकावले आहे. जगातल्या सर्व इत्थंभूत घडामोडींचे दर्शन होते वर्तमानपत्रांतून. हजारो मैल दूर असलेल्या देशातील, व जगातील कानाकोपऱ्यांतील घटनांचे ज्ञान मिळते रोज वर्तमानपत्रांतून. मासिके ललित लेखनाने मनोरंजन करतात. आता ह्या सर्व गोष्टी टी.व्ही. वर चित्ररूपाने दिसतात.

टी. व्ही. वरील बातम्यांच्या माऱ्यामुळे वर्तमानपत्रांचे वाचन यथातथाच होऊ लागले आहे. टी.व्ही. वरील अनेक कथानकांवरील सीरियल्समुळे मासिकाचा वाचकही कमी होऊ लागला आहे. वर्तमानपत्रे, मासिके ही वर वर वाचण्याच्या सवयीमुळे विचारपूर्वक, व शोधक बुद्धीने वाचण्याचा मनास कंटाळा येऊ लागतो. यामुळे वरवरचे, उथळ पांडित्य चोहोकडे माजते व खऱ्या विद्वत्तेचा लोप होतो. जिकडे तिकडे पोथीपंडितांचा, पदवीपंडितांचा व उथळ पंडितांचा आता संचार दिसतो. 'उथळ पाण्याला खळखळाट फार' ही म्हण या पंडितांना लागू पडते.

पोप कवीने एका कवितेत म्हटले आहे की, A little knowledge is a dangerous thing या कवितेचा सारांश असा. ''चुटपुटती विद्या ही फार भयंकर गोष्ट आहे. विद्यारूप झऱ्याशी तोंड लावून ती यथेच्छ प्राशन तरी कर, नाही तर एक थेंबही घेऊ नको. कारण त्याचा विचित्र गुण असा आहे की थोडेच घोट घेतले असता त्यांनी माथे फिरून जाते, पण तेच पुष्कळ जसजसे घ्यावे तसतसा त्याचा मद उतरत जातो.''

भर्तृहरीने नीतिशतकात म्हटलंय की 'जो केवळ अज्ञानी आहे त्याची लवकर समजूत करून देता येते. जो ज्ञाता आहे त्याची समजूत खूप लवकर होते. पण ज्ञानाचा अर्धवट संस्कार झालेल्या माणसाचे समाधान ब्रह्मदेवही करू शकत नाही. 'बुझावू शकेना विधाता तयाला.'

अशी ही ज्ञानाची प्रचंड भांडारे म्हणजे ग्रंथ होत. आणि हे ग्रंथ उपलब्ध होण्याची जागा म्हणजे ग्रंथालये किंवा वाचनालये. पूर्वी राजदरबारातील हुशार व विद्वान व्यक्तींना ग्रंथालयात प्रवेश असे. राजे लोकच जुन्या ग्रंथांच्या नकला करवून ग्रंथालयात ठेवत. हे काम अत्यंत खर्चीक असे. ग्रंथांचा खर्च सामान्य जनांच्या आवाक्याबाहेरचा होता.

काळ झपाट्याने पालटू लागला. राजांप्रमाणे सरदारही आपल्या संपत्तीत 'ग्रंथांची संपत्ती' बाळगू लागले.

कागदाचा शोध आणि छपाईची कला यांमुळे एका ग्रंथाच्या अनेक प्रती सहज उपलब्ध होऊ लागल्या व प्रत्येकजण आपल्या घरात ग्रंथ बाळगू लागला. जे ग्रंथ विकत घेणे परवडणार नाही असे ग्रंथ सार्वजनिक ठिकाणी म्हणजेच ग्रंथालयात वाचनासाठी उपलब्ध होऊ लगले.

या ग्रंथालयांची महती गाताना सुप्रसिद्ध विचारवंत व लेखिका दुर्गा भागवत म्हणतात-''ग्रंथ हे वाचकाला प्राणवायू पुरविणारे अद्भुत गुरू आहेत. ग्रंथालयांचे माझ्यावर अगणित उपकार आहेत. ग्रंथालयांशी माझी सांगड जर माझ्या आपत्कालात पडली नसती तर मी वेडी झाली असते. मला ग्रंथालयांनी ज्ञान दिले, प्रेम दिले, माणुसकी दिली अन् अमर आशावाद दिला.''

स्वातंत्र्यानंतर अनेक ठिकाणी ग्रंथालये उभी राहिली. भारतीय स्वातंत्र्याच्या उद्दिष्टांमध्ये 'गाव तेथे प्राथमिक शाळा, गाव तेथे ग्रामपंचायत, गाव तेथे सहकारी संस्था व गाव तेथे ग्रंथालय' ही चार उद्दिष्टे अंतर्भूत होती.

प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत आणि सहकारी संस्था ह्यांया तीन उद्दिष्टांच्या उपलब्धीमध्ये बरीच प्रगती झालेली दिसते. पण गाव तेथे ग्रंथालय हे उद्दिष्ट फारच मागे पडले आहे असे जाणवते. महाराष्ट्रात म्हणजे ज्या राज्याला आपण पुरोगामी व प्रगतिशील राज्य मानतो, ग्रंथालय चळवळीची प्रगती अगदीच नगण्य आहे. आज महाराष्ट्र राज्यात सुमारे ६००० ग्रंथालये नोंदविलेली आहेत तर त्यातील सुमारे २००० ग्रंथालये बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

संदर्भसेवा उपलब्ध करून देणारी मोठी ग्रंथालये तर अगदीच बोटांवर मोजण्याइतकी आहेत. महाराष्ट्रातल्या चाळीस हजार गावांपैकी चार हजार गावांत ग्रंथालये आहेत याचा अर्थ १० टक्के उपलब्धी व ९० टक्के गावे ग्रंथालयांना वंचित अशी ही दुरवस्था आहे.

या दुरवस्थेला शासन आणि समाज हे दोन्ही सारखेच जबाबदार आहेत. नवीन ग्रंथालये उभारणे राहू द्या, पण आहेत ती ग्रंथालये टिकवणे ही खरी समस्या आहे.

ग्रंथालये हे सामाजिक जागरणाचे व प्रबोधनाचे प्रमुख माध्यम आहे. या शैक्षणिक संस्था आहेत. समाजशिक्षणाबरोबरच समाजाची सदभिरुची वाढवणे, समाजाला चिंतनशील, मननशील बनविणे, सदद्विवेक जागृत करणे, आपले विचार समाजापुढे मांडण्यासाठी निर्भय बनविणे हे ग्रंथवाचनाने साध्य होते. आणि हे ग्रंथच जनतेला उपलब्ध झाले नाहीत तर त्या समाजाला प्रगत कसे म्हणावे असा प्रश्न पडतो.

ग्रंथालयाचे व्यवस्थापन हाही एक उपेक्षित प्रश्न आहे. ग्रंथपालांचे वेतन, इमारतींचे भाडे, वीज, पाणी, कर्मचाऱ्यांचे पगार, हे सर्व , ग्रंथालयांचे उत्पन्न व मिळणारे अनुदान यांत भागू शकत नाहीत. दरवर्षी नवीन येणाऱ्या पुस्तकांची खरेदीही होऊ शकत नाही. म्हणूनच महाराष्ट्रात आज सुमारे २००० ग्रंथालये बंद पडलेल्या अवस्थेत आहेत, आणि ही संख्या वाढतच राहील असे वाटते. ग्रंथालये ह्या शैक्षणिक संस्था न मानता व्यापारी संस्था मानल्या जातात व त्याप्रमाणे वीजदर वगैरे आकारले जातात ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

आता ज्यांच्याकरिता म्हणजे ज्या वाचकांसाठी ही ग्रंथालये उभारली जातात, त्यांचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोण, बघू या. दृक्‌श्राव्य माध्यमांमुळे ग्रंथालयाकडे वाचक वळेनासा झाला आहे, ही खेदजनक वस्तुस्थिती आहे. बाह्य जगाशी संपर्क जोडणारा ग्रंथ हा एक दुवा होता. पण आज दृक्‌श्राव्य, इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे ग्रंथसंस्कृती नष्टच होईल किंवा काय अशी भीती वाटते. ही माध्यमे ग्रंथांवर आक्रमण करतील काय, हा पुढील शतकातला महत्वाचा प्रश्न आहे. यासाठी आजच शाळा व कॉलेजांच्या अभ्यासक्रमांमध्ये पाठ्यपुस्तकांपेक्षा वेगळी पुस्तके वाचण्याची सवती करणे आवश्यक आहे.

याकरिता वाचन व परीक्षण असा किमान शंभर मार्कांचा पेपर इ. दहावीपासून पुढील वर्गासाठी ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने कोणत्याही विषयांवरचे दोन ग्रंथ वाचून त्यांवर परीक्षण लिहिणे. हे परीक्षण कसे करावे याच्यासाठी मार्गदर्शक तत्वे विद्यार्थ्यांना पुरविली जावी. यासाठी ५० गुण असावेत. तसेच एखाद्या खेळाची संपूर्ण माहिती व सद्यस्थिती यावर लेखनासाठी ३० गुण असावेत. आजच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे स्वतंत्रपणे मनन, चिंतन करण्याची सवय लावणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थी दरवर्षी २ पुस्तके विकत घेईल अथवा ग्रंथालयाकडे वळेल. उरलेले २० गुण विशिष्ट विषयाच्या प्रकल्पासाठी म्हणजेच संशोधनासाठी असावेत.

याप्रमाणे ग्रंथालयांचे महत्त्व वाढवायचे असेल किंवा ग्रंथालयांकडे वाचक वळवायचा असेल तर ग्रंथालये सुसज्ज होणे आवश्यक आहे. ग्रंथालयाला स्वतःची मोठी इमारत, ग्रंथ ठेवण्यासाठी अद्ययावत् फर्निचर, भरपूर उजेड व मोकळे हवापाणी आवश्यक आहेत.

आज माहितीचा विस्फोट होत आहे त्या दृष्टीने आतापासूनच ग्रंथालयांनी आधुनिक दृष्टिकोण स्वीकारणे अपरिहार्य आहे. जुन्या ग्रंथांचे जतन करण्यासाठी मायक्रोफिल्मिंग तंत्र वापरणे, संगणकाच्या कॉम्पॅक्ट डिस्कवर (सीडी) ग्रंथ थेट नोंदविणे, सीडी रोम तंत्राचा वापर करून संपूर्ण पुस्तक उपलब्ध करणे इ गोष्टी

(पान क्र. ३३ वर)

# अलीकडेच घेतलेला लक्षणीय ग्रंथ

प्रा. मोहन पाठक

अलिकडेच झालेल्या पुस्तकखरेदीत बरीच पुस्तके उल्लेखनीय आहेत. आमच्याकडे व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने घेतलेली काही पुस्तके, भारतीय भाषांतील महत्त्वपूर्ण पुस्तकांच्या अनुवादित मालिकेप्रमाणेच रसायनशास्त्रातील महत्त्वाची पुस्तकेही बरीच सांगता येतील.

या पुस्तकांत ठाण्याच्याच संदर्भ प्रकाशनाने प्रकाशित केलेला 'शालेय ग्रंथालये' हा ग्रंथ मला विशेष आवडला. ग्रंथाचे लेखक श्री. वसंतराव सावे व प्रकाशक श्री. प्रदीप कर्णिक दोघेही जाणकार ग्रंथपाल असल्याने एका उपेक्षित विषयावर चांगला ग्रंथ निर्माण होऊ शकला आहे. शैक्षणिक विश्वात ग्रंथालयांची कायमच उपेक्षित विषयात गणना होते. या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये चांगले वाचक घडविणारी ग्रंथालये असतील तर महाविद्यालयात सुजाण वाचक येऊ शकतील व लाखो रुपयांचे ग्रंथ वाचले जातील, हे मला सतत जाणवत राहिले आहे. शालेय ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोणच इतका उदासीन आहे की पौगंडावस्थेत येऊनही अपरिपक्व रहाणारे वाचक महाविद्यालयांत येतात व फक्त पाठ्य पुस्तके वापरून शिक्षण पूर्ण करण्यात धन्यता मानतात.

या दृष्टीने साव्यांसारख्या विषयाचे सखोल ज्ञान व वाचन असणाऱ्या जाणकार ग्रंथपालाला हा विषय ग्रंथरूपाने मराठीत आणावासा वाटला. ग्रंथ प्रामुख्याने शाळांना उपयोगी आहे, मुख्याध्यापकांना उपयोगी आहे हे माहीत असूनही आमच्या महाविद्यालयात तो मी घेतला व व विद्यार्थ्यांच्या नजरेस आणूनही देणार आहे. कारण विद्यार्थीदशेतच जर विद्यार्थ्यांना या उपेक्षित विषयाचे महत्व समजले व या अनेकानेक विद्यार्थ्यांपैकी कोणी मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रंथपाल झाले तर त्यांना या विषयाचे महत्त्व कळावे. विज्ञान महाविद्यालयातून निर्माण होतात ते सगळेच वैज्ञानिक नसतात तर B.Sc., B.Ed., M.Sc. B.Ed., अशा पदव्या धारण करून विज्ञान शिक्षकही होऊ शकतात. शाळांमध्ये शिकवताना शिक्षकाला जर ग्रंथालयाचे महत्व माहीत असेल तर तो भविष्यातला शिक्षक ग्रंथालयाचा योग्य उपयोग करील. व त्याच्या कळत न कळत त्याच्यावर या ग्रंथाच्या माध्यमातून पौगंडावस्थेत मला संस्कार साधता येतील, हा विचार हे पुस्तक घेताना माझ्या मनात होता.

श्री. वसंतराव सावे यांचा हा ग्रंथ नऊ प्रकरणांमध्ये विभागलेला असून वाचनाच्या महत्त्वापासून ते शालेय ग्रंथालयाच्या विकासापर्यंत सर्व अंगोपांगांवर विस्तृत व अभ्यासपूर्ण विवेचन आहे. वाचनसवयींचा विचार मांडताना श्री. वसंतराव सावे म्हणतात, 'टी.व्ही. वर पाहिलेल्या व ऐकलेल्या चित्रपटांच्या, मालिकांच्या कथांचा परिणाम मुलांच्या मनावर एवढा होतो की त्यांना पुस्तकातील कथा निरर्थक वाटतात (पृ.४१) व म्हणूनच कुटुंबातील वाचन सवयींच्या अभावाच्या प्रभावात वाढणाऱ्या मुलांना त्यांच्या कलेने वाचायला प्रवृत्त करणे ही शालेय ग्रंथालयांची एक शैक्षणिक जबाबदारीच असते.'' (पृ.४२) आणि +२ हा स्तर शाळांनाही व महाविद्यालयांनाही संलग्न झाल्यामुळे निर्माण झालेल्या मानसिक समस्यांची ज्याला जाण आहे त्या सुजाण वाचकाला वरील उदाहरणातील 'शालेय' या शब्दाऐवजी 'महाविद्यालयीन' शब्द वापरण्याची गरज आहे. हे कळू शकेल.

श्री. सावे यांनी पुढे, ग्रंथालयाची जागा कशी असवी, साहित्याचे स्वरूप कसे असावे इ. तांत्रिक तपशील अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले आहेत. आमच्या विज्ञान महाविद्यालयातून B.Sc. पूर्ण केलेल्या व नंतर पदव्युत्तर B.Lib. पूर्ण केलेल्या एका विद्यार्थिनीची आठवण येथे नमूद करणे भाग आहे. बालमोहन विद्यामंदिराची ग्रंथपाल म्हणून तिची नेमणूक झाल्यानंतर काही काळ ती माझ्या संपर्कात होती. तिने शालेय ग्रंथालयाबद्दलच्या बऱ्याच बाबी समजून घेतल्या. प्रत्यक्षाच्या किंवा व्यवहाराच्या पातळीवर येणाऱ्या दैनंदिन अडचणी समजून घेतल्या. त्या वेळेला आमच्या

महाविद्यालयात हे पुस्तक असते तर ... हा विचार पुस्तक घेताना मनात डोकावला. विज्ञान शाखेच्या तृतीय वर्षात असताना, पुढील शिक्षणाच्या संधीमध्ये ग्रंथालयशास्त्र असते अशी जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने काही पुस्तके मी घेतली. त्यांचा उपयोग अशा विद्यार्थ्यांप्रमाणेच B.Lib. करणाऱ्या काही माजी विद्यार्थ्यांनाही होतो. त्या ग्रंथाच्या ओढीने ते परत महाविद्यालयात ग्रंथालयात येतात व त्यांचे संस्थेशी असणारे ऋणानुबंध वाढतात.

श्री. वसंतराव सावे यांच्या या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे हा ग्रंथ एकांगी नाही. आवश्यक अशा सर्व ठिकाणी त्यांनी अनेक समित्यांचे अहवाल, समित्यांच्या शिफारशी, ग्रंथालयसंघटनांचे ठराव, अहवाल यांचे दाखले दिले आहेत. यामुळे त्यांच्या या ग्रंथास संदर्भमूल्य प्राप्त झाले आहे. खरे तर शाळेत हा ग्रंथ विकत घेतला जाईल याची तरतूद शासकीय स्तरावर होण्याची गरज आहे. एकंदर उदासीन वृत्ती पाहता, हे होईल याची शक्यता कमीच वाटते. असे झाले तर जिल्ह्यातील शाळांनी, मुख्याध्यापकांनी, ग्रंथपालांनी परिसरातील महाविद्यालयांचे साहाय्य घेणे अपेक्षित असते. सरस्वती सेकंडरी स्कूलचे टिळक सर किंवा असे जुने मुख्याध्यापक या दृष्टीने करण्यात आलेल्या महाविद्यालय शाळा समूहाच्या संकल्पनांना नक्कीच विसरलले नाहीत. आंतर संस्थात्मक स्तरावर आपल्या जिल्ह्यात एखाद्या लहान शाळेस सदर ग्रंथाचा संदर्भ लागला तर तो महाविद्यालयासारख्या ग्रंथालयातही उपलब्ध हवा कारण दोन्ही ग्रंथालये ही मूलतः शैक्षणिक ग्रंथालये आहेत आणि त्या दृष्टीने या ग्रंथाची संदर्भ सूची (पृ.१९३) मुद्दाम लक्षात घेण्यासारखी आहे. तीत Chandler.G.या लेखकाचे Libraries of modern world 1965 (येथे प्रकाशकाचे नाव, पृष्ठे यांचा तपशील लेखकाने देणे गरजेचे होते.) Gates.J.U. चे Introduction to Librarianship, (1968) कृ.मुं. उपलंबकरांचे 'ग्रंथालयाची पाच सूत्रे' (1962) इ. ग्रंथांचा समावेश आहे. याचा अर्थ School Librarianship व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षण यांचा वरकरणी संबंध वाटत नसला तरी ग्रंथपालन व्यवसायाकडे, अध्यापन व्यवसायाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांनी असे Librarianship वरील ग्रंथ निदान उत्सुकतेपोटी वाचले तर भविष्यात या विषयाची उपेक्षा थांबू शकते.

'शालेय ग्रंथालय' या ग्रंथाला प्रस्तावना लिहिणाऱ्या थोर लेखिका व विदुषी श्रीमती दुर्गा भागवत त्यांच्या प्रस्तावनेत म्हणतात, ' मन निरोगी, आणि विवेचक असणे विद्यार्थिदशेत आवश्यक आहे. तो हेतू श्री. सावे यांनी प्रभावीपणे लहान थोरांपुढे अतिशय सोप्या भाषेत आणि तितक्याच सावधपणे ठेवला आहे. हे त्यांचे मोठे यश आहे. लोक (फक्त शालेय जगतातीलच नव्हे !) (कंसातील वाक्य माझे आहे!) ग्रंथांचा आदर करोत असे मी म्हणेन.' (पृ.६)

त्यामुळे सदर लेख वाचणारा अध्यापक असो, प्राध्यापक असो, मुख्याध्यापक असो, विद्यार्थी असो, त्याने चाळावा, वाचावा चिंतन करावा असा हा ग्रंथ आहे. एवढेच मला सुचवायचे आहे.

वाचकांच्या सोयीसाठी ग्रंथविषयक तपशील-

शालेय ग्रंथालय-लेखक : श्री. वसंत सावे
प्रकाशक : संदर्भ प्रकाशन, ठाणे.
पृष्ठे १९६, मूल्य रुपये २००/-

•••

# ।। बोंबल्या राक्षसाचा बंदोबस्त... एक समस्या ।।

**प्रा. मोहन पाठक**

विसाव्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यात जगत असताना मानवी जीवनासमोरील यक्षप्रश्नांचे क्षितिज विस्तारतच जात आहे. या शतकातील सर्वांत मोठी शोकान्तिका म्हणजे दुसऱ्या महायुद्धाने उद्ध्वस्त केलेली जीवनमूल्ये व विज्ञानाच्या गैरवापरातून आपणच स्मशानाप्रत नेणारी केलेली भोगवादी जीवनाची पायवाट!

या शतकाचा शेवट होता होता अंतर्मुख होऊन विचार करा, लोकसंख्येच्या केंद्रीकरणातून वाढत जाणाऱ्या शहरी वस्त्या मानवी जीवनाला कलंक व उद्योगीकरणाचे वरवंटे फिरले की प्रगतीबद्दल स्वतःच स्वतःची पाठ थोपटायची, असल्या आजच्या माणसाला जगता येईल इतका वीतभर तुकडाही पृथ्वीवर उरणार नाही. इतर अनेकानेक प्रश्न हे स्वतंत्र चिंतनाचे, संशोधनाचे विषय आहेत. या लेखापुरती सीमा मी आखून घेत आहे ती ध्वनिप्रदूषणाच्या प्रश्नाची तोंडओळख करून देण्याची.

दूरदर्शनवरील, "दादाजी, दादाजी हरियाली क्या होती है ?" या जाहिरातीतील एकविसाव्या शतकातला मुलगा जेव्हा माझ्या कल्पनेत रूप पालटतो, तेव्हा विचारीत असतो," दादाजी, दादाजी शान्ती क्या होती है?" व दादाजी अनोख्या पद्धतीने उत्तर देतात," तुम क्या जानो बेटा, ढूँढते रह जाओगे !" हा प्रसंग जेव्हा माझ्या कल्पनापटात बदलतो तेव्हा मला जाणवतो प्रश्न सर्वदूर व्यापलेल्या गोंगाटाचा. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना शांतता हा एक संशोधनाचा ठरावा असा विषय झाला आहे व चिरशांती प्राप्त झाल्याशिवाय शांतता मिळणे अशक्य झाले आहे.

या समस्येने आज अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे. तुम्ही कोठेही असा, तुमचा परिसर आवाजाने व्यापलेला आहे. घराबाहेर पडलात की जणू काही आवाजाच्या अथांग सागरात उडी मारावी तसा अनुभव येतो. रस्त्यावरील रहदारीमुळे होणारा आवाज, बाजारातील गोंगाट यांच्या जोडीला शहरी वाहतुकीचे व्यवच्छेदक लक्षण असणारा 'ट्रॅफिक जाम' मधील आवाज, मिरवणुका, बँड, फटाके, मोर्चे, घोषणा यांनी व्यापलेले माणसांचे जथे पाहिले की या गोंगाटाची सहज कल्पना येते. जाम झालेल्या या ट्रॅफिकमध्ये अवजड ट्रक असो वा दुचाकी स्कूटर, प्रत्येकाचा कर्कश हॉर्न वाजत असतो. ट्रॅफिक जाम आहे, पुढे जाण्यास विलंब होणार आहे हे माहीत असूनही जो तो आपल्या पद्धतीने हॉर्नवादन स्पर्धेतील स्पर्धक बनू पाहतो. प्रत्येकाला दुसऱ्याच्या पुढे जाण्याची घाई! यातच 'हार्ड बीट्स' चे ठाण ठाण संगीत असणारे रिक्षावाले आवाजाची तीव्रता वाढविण्यातला आपला वाटा उचलत असतात. मिरवणुकांसमोर वाद्यांच्या वेड्यावाकड्या सुरावटींवर वेडेवाकडे हातवारे करीत नाचणे आणि फटाक्यांची आतशबाजी करणे. हा तर मिरवणुकांमध्ये मिरवणाऱ्या प्रत्येक भारतीयाचा जणू काही जन्मसिद्ध हक्क असतो...

वसंत आबाजी डहाके आपल्या 'योगभ्रष्ट' कवितेत म्हणतात, 'या सर्वांपासून दूर जावसं वाटतं... '' पण नाइलाजाने नशिबी आलेले चक्रव्यूह आपण तुडवीत राहतो.

या सर्वांपासून दूर पळावं आणि डोक्यावर असणाऱ्या आपल्या घराच्या छपराखाली यावं तर तेथेही आवाजाचे स्फोट होतच असतात. मुळात ब्लॉक नावाच्या भिंतींना आणि त्या चार भिंतीत ठासून भरलेल्या सुखोपभोगाच्या वस्तूंना घर का म्हणतात हेच माझ्या अल्पमतीला कोडे आहे. यातील प्रत्येक वस्तू जणू काही आवाजाच्या तत्त्वावर जिवंत राहण्याच्या दृष्टीने बनलेली असते. रेडियो, टी.व्ही. आणि टेपरेकॉर्डर, सी.डी. प्लेअर यांनी आमच्या सामाजिक आणि व्यक्तिजीवनाचे संदर्भच साफ बदलून टाकलेत. याशिवाय शिवणयंत्राचा आवाज, नळातून अस्थानी वाहणाऱ्या

अनावश्यक पाण्याचा आवाज, टेलिफोन, मिक्सर, स्वयंपाकघरातील भांड्यांचे कर्कश आवाज... सगळे आवाजी पद्धतीने आपले योगदान करण्यासाठी सज्ज असतात. टेपरेकॉर्डर, टी.व्ही. यांचा आवाज किती असावा हे ठरवायचे हाच प्रश्न आहे. कोण कोणाला सांगणार? कारण जो तो ''माझ्या घरात मी वाटेल ते करीन, तुमच्या... काय जातं?'' म्हणून, सांगायला जाण्याचा गाढवपणा कोणी केलाच तर बाह्या सरसावून भांडायला तयार.

घरातील टेलिफोनची बेल आणि दरवाजावर असणारी कॉलबेल यांचे पूर्वजन्मीचे काही तरी सख्य असावे असेच मला वाटते. एक वाजली की दुसरी तिच्या पाठोपाठ वाजलीच म्हणून समजा. यातूनही चुकून माकून काही शांतता उरलीच तर चोवीस तास चालणारे पंखे, 'सोसायटी' नामक इमारतीतील दरवाजांचे बंद केल्याचे आवाज या शांततेवर ओरखाडे ओढतच असतात. शिवाय लहान मुलांचे आरडाओरडीचे आवाज, ब्लॉक नामक घरात होणारी आणि पलिकडच्या भिंतीमधून सहज पाझरणारी 'नॉर्मल' वादावादी, भांडणे, यांची भर असतेच.

आपण उत्सवप्रिय असल्याचा केवढा अभिमान बाळगतो. उत्सवांना तर तोटाच नाही. या उत्सवांची मीमांसा करावयाची झाल्यास स्वतंत्र पुस्तक लिहावे लागेल. पण आवाजाच्या संदर्भात बोलावयाचे झाल्यास ३१ डिसेंबरला रात्री १२ वाजता वाजणारे फटाके येथपासून ते पुढच्या ३१ डिसेंबरपर्यंत उत्सवातून वाहणाऱ्या आवाजांचे धबधबे कानांवर आदळत असतात. आज काय बाजूच्या बिल्डिंग मध्ये लग्न आहे, उद्या काय सत्यनारायण आहे, येथपासून ते गणेशोत्सव व नवरात्रोत्सवापर्यंत ध्वनिक्षेपकाचा आधार घेऊन आमची माणसे आणि विकृत सिनेमांमधील लोकप्रिय म्हणविली जाणारी गाणी सतत वाजत असतात. इतकी माणसे इतक्या विविध प्रकारे आपली संपत्ती, शक्ती आणि वेळ खर्च करून कशी जगू शकतात हे आश्चर्यच आहे. 'मनुष्यतास' या संकल्पनेनुसार वेळेचे गणित मांडले तर वाया जाणाऱ्या वेळात आपण काय काय साधू शकलो असतो याचा विचार आपण कधी करणार? लाउडस्पीकर नावाचे साधन आपण कशासाठी, कधी वापरायचे याचेही काही नियम असावेत. अशी आपली आजची वापरपद्धती आहे. 'डेसिबल'या ध्वनितीव्रता मोजण्याच्या परिमाणानुसार लाउडस्पीकर्समुळे वाढणारी ध्वनीप्रदूषणाची पातळी अतिशय भयानक आहे.

घरात दारे खिडक्या लावून बसले तरी ध्वनिक्षेपकातून प्रक्षेपित होणारा आवाज कानांवर आदळतच असतो.आमच्याकडे दिवस ३६५, पण सण उत्सव मात्र त्यापेक्षा अधिक, त्यामुळे हा प्रकार आहे.

'घाई करेल तो जगेल' हा दुसऱ्या महायुद्धाने मानवी समाजाला दिलेला शाप आहे. जगण्याची घाई इतकी आणि उपभोगण्यासाठीचे हपापलेपण इतके की 'ग्रामीण जीवनाची' संकल्पना ही फक्त कोशवाङ्मयातूनच आपल्याला कळू शकेल. शहरे वाढली, पैसा वाढला, तो इतका वाढला की लायकी नसणारे नवश्रीमंत समाजावर पैशाच्या जोरावर राज्य करायला लागले आणि त्यांच्याच कृपेने रस्ते व्यापून टाकणाऱ्या लहान संस्कृतीतून भोगवाद तळागाळापर्यंत पोहोचला. ध्वनी या एका विषयाभोवती विचार करीत राहिलो तरी वाहनांचा सुळसुळाट हा किती ध्वनिकारक आहे ते जाणवेल.

शाळा, मंदिरे, दवाखाने, महाविद्यालये, ग्रंथालये (म्हणजे काय असते रे भाऊ... ? -संदर्भ पु.ल.देशपांडे यांची 'वाऱ्यावरची वरात') या सर्व संस्था 'सायलेन्स झोन' मध्ये असण्याची गरज आहे. पण आज सायलेन्स झोन आहेच कुठे? असा काही 'झोन' असतो याचाही आम्हाला विसर पडला आहे. कोठेही गेलो तरी आवाज, आवाज आणि आवाज ! या आवाजाच्या बोंबल्या राक्षसाचे समाजावर जणू अधिराज्य चालू आहे.

या ध्वनिप्रदूषणाच्या तोट्यांबद्दल काय बोलावे ? आजकाल कुठला विकार कशामुळे होईल याला मुळातच काही तर्कशास्त्र नाही. सोळा अठरा वर्षांच्या तरुण विद्यार्थ्याला हार्ट ट्रबल आहे, आठ वर्षाच्या मुलाला डायबेटिस आहे आणि दोन अडीच वर्षांच्या मुलीला जाड्या भिंगांचा चष्माही आहे ! यामध्ये नेमके काय आहे? तर प्रदूषणाचे दूरगामी परिणाम. ध्वनिप्रदूषणामुळे बहिरेपणा येतो

हे तर सर्वज्ञातच आहे परंतु हृदयाचे विकार, रक्तदाबाचे विकार, मानसिक अनारोग्य, स्वभावात येणारा भडकपणा किंवा चिडचिडेपणा, मेंदूचे विकार, एकाग्रता साधण्यात येणारा व्यत्यय, पूर्ण नैसर्गिक झोपेचा अभाव, कोलेस्ट्रॉलचे वाढते प्रमाण... कितीतरी समस्या या समस्येतूनच निर्माण झाल्या आहेत.

आणि प्रगतीच्या पथावर घोडदौड करणाऱ्या आपल्या देशात ध्वनिप्रदूषणाचे नियंत्रण प्रभावीपणे होऊ शकेल यासाठी व्यापक पण प्रभावी कायदा अस्तित्वात नाही. मुळात कायदा म्हटला की पळवाट आलीच ही आमची धारणा ! त्यामुळे कायदा असून तरी उपयोग काय होणार म्हणा ! पण तरीही कोणत्या कारखान्यात कोणती यंत्रे व किती प्रमाणात हवीत, नगरवस्ती व कारखाने यांच्यात किती अंतर हवे, कारखान्यातील यंत्रांना सायलेन्सर बसविण्याची तरतूद, तसेच सार्वजनिक कार्यक्रम किती असावेत, उत्सव किती हवेत, सुरक्षा किती हवी... अशा अनेकानेक बाबी विचारात घेऊन कार्यवाही केली गेली पाहिजे.

घनदाट वृक्ष आवाजाची तीव्रता कमी करून ध्वनिप्रदूषण थांबविण्याच्या दृष्टीने उपयोगी असतात असे म्हटले जाते. पण आमच्या शासनयंत्रणेत आणि समाजाला झाडे तोडण्यात एक उपयुक्त वस्तू एवढाच एक झाडांचा उपयोग माहीत आहे. झाडांची संख्या कमी होत गेल्याने वपन केलेल्या सुंदर स्त्रीसारखी अवस्था झालेले बकाल मुंबई शहर पाहिले, की प्रगतीच्या कल्पनांची भीतीच वाटायला लागते.

यासाठी आवश्यक काही जर असेल तर शिक्षणाची, सामूहिक इच्छाशक्तीची जाणीव सामान्यांपर्यंत निर्माण झाली पाहिजे. शहरांमधील सार्वजनिक वाहतूकव्यवस्था उत्तम व नियमित करून खाजगी वाहनवापराला शहरात बंदी घातली पाहिजे. काही देशांत ज्याप्रमाणे सायकलीचा वापर सक्तीचा आहे, इतर वाहने वापरता येत नाहीत, त्याप्रमाणे आपल्यालाही वाहनबंदी चळवळ उभी करावी लागेल. एक माणूस एक मोठी (आरमाडा, सुमो, इ. नावाची!) गाडी घेऊन एकटाच ट्रॅफिकजाममधील जागा अडवतो. शिवाय वाहनातून निघणारा धूर तर वेगळाच विषय आहे व गरज नसताना श्रीमंतीच्या हौसेखातर रस्ता व्यापतो, हा गुन्हा समजायला हवा. त्यापेक्षा सार्वजनिक वाहतूकव्यवस्था उत्तम करा. लांबच्या प्रवासात खाजगी वाहन वापरा, पण शहरात फिरताना मात्र सार्वजनिक वाहनच वापरावे अशी चळवळ उभी राहिली तरी ध्वनिप्रदूषणाची तीव्रता कमी करण्यात यश येईल. त्याचबरोबर पर्यावरण स्वच्छ राहील. ऊर्जेची बचत होईल हे वेगळे !

आज प्रदूषणाचेच इतके असंख्य प्रकार अस्तित्वात आहेत की आपण जगतो कसे हेच मला मोठे कोडे आहे. आपल्या शहराचे भोपाळ व्हायला क्षणाचाही अवधी नाही अशी आजची परिस्थिती आहे. ' पण मला काय देणं घेणं आहे.. '' या स्वार्थी विचारसरणीत जो तो गुंगून गेला आहे.

कधी कधी किशोरकुमारच्या त्या सुरेल आवाजाला विचारावंसं वाटतं, त्या 'दूर गगन की छाँव में'' या चित्रपटात तू ज्या गगनाचं स्वप्न पाहिलं होतंस ते गगन तुला नंतर तरी दिसलं का ? काय सुंदर ओळी होत्या,

आ चल के तुझे मैं लेके चलूं

कुछ ऐसे गगन के तले...

पण किशोरकुमार चा तो स्वर्गीय आवाजही दुःखाने, 'नाही' असेच उत्तर देईल की काय याची भीती वाटते. आणि याचीही की, मर्ढेकरांनी म्हटल्याप्रमाणे ''पिपात मेले ओल्या उंदिर...'' असं आपलं मरण बॉम्बमध्ये ठासून बसलेल्या अणूवर किंवा कानठळ्या बसविणाऱ्या ध्वनिलहरींवर तर लिहिलेले नसेल ना ... ?

•••

# घटक संस्थांच्या ग्रंथालयांचे संगणकीकरण
## -एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प

प्रा. मोहन पाठक

आमच्या विद्याप्रसारक मंडळाच्या 'ठाणे महाविद्यालय' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या परिसरात एकूण पाच घटक संस्था उच्च शिक्षणक्षेत्रात काम करीत आहेत.१) बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, २) जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालय, ३) विधिमहाविद्यालय, ४) विद्याप्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन व ५) व्यवस्थापन संस्था. या पाचही घटक संस्थांची ग्रंथालये वेगळी आहेत व सर्वांची मिळून ग्रंथसंख्या लाखाच्या घरात आहे. या ग्रंथालयांचे संगणकीकरण करण्याचा व नंतर हे संगणक एकमेकांना जोडून Local Area Network (LAN) करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सध्या राबविण्यात येत आहे.

कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये ग्रंथालय हा इतका महत्त्वाचा विभाग असतो की त्याला संस्थेचे हृदय अशी उपमा दिली जाते. आमच्या परिसरातील ग्रंथालयेही याला अपवाद नाहीत. मात्र इतर अनेक शैक्षणिक संस्थांत सर्वसामान्यपणे ग्रंथालयाकडे उपेक्षावृत्तीने पाहिले जाते. त्यामुळे ग्रंथालयांचा विकास परिपूर्ण होण्यात अडचणी येतात. 'ग्रंथालयांना काय काम असते' असा दृष्टिकोण सर्वच घटकांत आढळतो. त्यामुळे ग्रंथालये कशीबशी टिकून असतात, शासकीय नियमांच्या परिपूर्तीसाठी त्यांचे अस्तित्व आहे इतकेच दाखविण्याकडे कल असतो. ग्रंथवाचनातून विद्यार्थी घडतात, त्यासाठी जास्तीत जास्त ग्रंथ, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे असते हे मान्य केले जाते, पण वापर मात्र याउलट असतो. याला संस्थांचे प्रमुख व मातृसंस्थांची ध्येयधोरणे कारणीभूत असतात.

आमच्या महविद्यालयांमध्ये प्रथमपासूनच संस्थांप्रमुखांपासून ते मातृसंस्थेपर्यंत सर्व घटक विद्यार्थ्यांच्या गरजांचा, भविष्याचा विचार करीत आलेले आहेत. त्यामुळे वर सांगितले त्याविरुद्ध चित्र आमच्याकडे आहे, हे अभिमानाने नोंदावे लागेल. आमच्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांच्यापासून ते सर्व प्राचार्यांपर्यंत सगळे जण ग्रंथालयविचारांना प्राधान्य देतात. त्यामुळे गेल्या ३० वर्षांत आमच्या परिसरातील ग्रंथालये हा आमच्या संस्थेच्या अभिमानाचा विषय आहे. पुरोगामी दृष्टी असणाऱ्या आमच्या संस्थेत, कालानुसार येणाऱ्या नवीन विधायक प्रवाहांचे स्वागतच केले जाते. प्रयोगशील व स्वागतशील वृत्तीतूनच इंटरनेट सेवा केंद्रापर्यंतच्या अद्ययावत सुखसोयी व शैक्षणिक सुविधा परिसरात उपलब्ध आहेत.

अशा स्थितीत आमच्या ग्रंथालयांचे संगणकीकरण झालेले नव्हते. ही उणीव आमच्यासह सर्वांनाच जाणवत होती. यासाठी आमच्या मंडळाच्या कार्यकारिणीतील डॉ. विजय बेडेकर यांच्यासह सर्व सदस्य व पदाधिकाऱ्यांनी संगणकीकरणाचे स्वप्न साकार कसे होईल याचा विचार केला. या क्षेत्रातील नामवंत ग्रंथपाल जी.के. मंजुनाथ, डॉ. एस्.आर.गणपुले, संगणक तज्ज्ञ श्री. निनाद प्रधान आदी अनेकांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू केले.

याकरिता प्रत्येक घटक संस्थेत होतकरू अशा संगणकाचे व ग्रंथालयशास्त्राचे प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवाराची नेमणूक करण्यांत आली आहे. त्यांच्याकडून प्रत्येक पुस्तकाच्या 'डाटा एण्ट्री शीट्स्' बनवून घेण्यात येत आहेत. नंतर या शीटस्‌मधील डाटा संगणकात भरण्यात येईल. पुढेमागे घटक संस्थेच्या प्रत्येक विभागातील संगणकांवर ही माहिती उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे परिसरातील कोणत्याही विभागात बसून केवळ संगणकाच्या वापरामुळे एखाद्या घटक संस्थेच्या ग्रंथालयातील ग्रंथांच्या उपलब्धतेविषयी सर्व माहिती कळू शकेल. पुस्तकदेवघेवीसाठी पारंपरिक अशा ब्राऊन; नेवार्क पद्धती आम्ही वापरत होतो. पण यासाठी बारकोडिंग पद्धतीचा वापर सुरू करण्याच्या दृष्टीनेही आमचे मंडळ विचार करीत आहे. त्यामुळे देवघेवीचे काम अगदी सुलभतेने व कमी वेळात करता येईल.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने देवघेवीच्या काउंटरवर सर्व्हर उपलब्ध करून देण्याचीही योजना आहे. या प्रकल्पाची ही सर्व माहिती देण्यामागे जो उद्देश आहे तो माजी विद्यार्थ्यांना आवाहन करण्याचा. या प्रचंड खर्चासाठी माजी विद्यार्थी जर आपल्या कुवतीनुसार देणगीरूपाने मदत करतील तर 'पैसा नाही म्हणून काम अडले' असे होणार नाही. माजी विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयाबद्दल मनात प्रेम असते. वेळप्रसंगी पुस्तकांच्या, संदर्भाच्या सहाय्यासाठी ते ग्रंथालयात येत असतात त्यामुळे या आवाहनाचा त्यांनी विचार करावा. यातून मंडळाच्या कार्याला गती येईल व LAN नंतर WAN (Wide Area Network) चा विचार करणेही शक्य होईल.

बदलत्या काळाचे संदर्भ लक्षात घेऊन प्रगतिशील विचारांनी काही तरी साध्य करू पाहणारी अशी आमची संस्था आहे. संस्थेची वेबसाईटही तयार झाली आहे. ती द्वारे जगात सर्वत्र आपल्या घटक संस्थांनी गेल्या ३० वर्षांतील इतिहासासह माहिती उपलब्ध आहे. कोणत्याही कामाची चेष्टा करणे, टीका करणे सोपे असते, उणिवा काढणे सोपे असते, पण काम करून दाखविणे कठीण असते. कर्मयोग आमच्या संस्थेच्या धडपडीचा इत्यर्थ आहे. त्यातूनच हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यास सुरुवात झाली आहे.

•••

(पान क्र. २६ वरून)

**वाचन व ग्रंथालये**

ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणात मोडतात. ग्रंथालयात आता रिकामी टेबले दिसणार नाहीत. प्रत्येक टेबलावर एक संगणक असेल व तो इंटरनेटशी जोडलेला असेल. या आधुनिक वाचकांच्या गरजा असतील.

यासाठी परंपरागत पद्धतीने काम करणाऱ्या ग्रंथपालांना नव्या तंत्रांचा अभ्यास करावा लागेल व ती तंत्रे आत्मसात् करावी लागतील.

यासाठी प्रचंड खर्च येणार आहे. तो सोसण्याची ताकद आजच्या ग्रंथालय संस्थांमध्ये नाही. शैक्षणिक कार्याकडे शासन पैसे वळवणार की नाही ? समाज सुशिक्षित व्हावा अशी शासनाची खरोखरच इच्छा आहे काय ? अज्ञ समाज म्हणजे व्होटं बँक मानणाऱ्या राजकीय पक्षांकडून जनतेने किती अपेक्षा ठेवाव्यात ?

शेवटी 'उद्धरेत् आत्मनात्मानम्' हीच उक्ती समाजाने आपल्यात बाणवावी. जेवढी मदत ग्रंथरूपाने, पैशाच्या रूपाने करता येईल तेवढी मदत ग्रंथालयांना जनतेने करावी व आपला बौद्धिक विकास साधावा. पर्यायाने राजकीय जागृतीही निश्चित होईल. सर्वार्थाने हतबल व निष्क्रिय झालेला समाज हीच या राष्ट्रातील खंत बाळगण्याची बाब आहे. समाजाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सक्रिय सुशिक्षित समाज, त्यासाठी उत्तमोत्तम ग्रंथनिर्मिती व त्यासाठी ग्रंथालये ही एक साखळी आहे. या साखळीचे दुवे आहोत आपण सारे जण.

# अतिशय उपयुक्त व स्मरणीय कार्यशाळेचा महिना

प्रा. मोहन पाठक

ऑगस्ट महिन्यांचे रूप ऑगस्टचे गेले २५ महिने मी पाहत आलो. त्यात ७२-७४ सालातले ऑगस्ट कसे गजबजलेले. उद्‌घाटन, कविसंमेलन, साहित्य सहकार, पावसाळी सहली आणि श्रमदान अशा आठवणींच्या क्षणांनी मोहोरलेले असायचे.

आणि अलिकडचे आगस्टललेले दिवस...! काय काय लिहायचं ? आयकार्डाचे प्रश्न, मेडिकल की इंजिनियरिंग, यूडीसीटी की व्हीजेटीआय या टांगत्या तलवारी घेऊन बावरलेले चेहरे... प्रवेश नाही तेव्हा सरांना भेटून तर पाहू असा विचार करीत चिंताक्रान्त चेहरे, मंत्रालयातल्या चिठ्ठ्या, वशिल्यांचे अगतिकप्रयत्न आणि आठवडी बाजार वाटावा तशी ही गर्दी! याच गडबडीत कोणी एन.एस.एस की एन्.सी.सी.(हो मार्कांचा सवाल आहे !) याच्या काळजीत, तर कोणी प्रॉजेक्टने झपाटलेले, कोणी कँटीनमधल्या फ्रेंडशिप डे ने शरीराचे उघडे भाग रंगवलेला तर कोणी कॉलेजच्या कट्ट्याच्या आधारे 'बेडा पार' करू पाहणारा... एकूण काय, गर्दी आणि गर्दी !

पण गेल्या ऑगस्टमध्ये अकरा ऑगस्टला पदवी महाविद्यालयातील प्राध्यापकांचा संप सुरू झाला अन् पदवी वजा ज्युनियर एवढीच गर्दी वावरताना दिसू लागली. काहीशी शाळकरी + २ या पातळीतील ही मुले. प्राध्यापक कधी गेटवर तर कधी मोर्चात. अशा वातावरणात अकरा ऑगस्ट या संपाच्या पहिल्याच दिवशी कॉलेजच्या प्रवेशद्वाराजवळ कमान दिसली ! मनात आले, संप करणाऱ्या प्राध्यापकांचं स्वागत तर ही कमान करीत नाही ना ...? पण नाही. कमान होती एका प्रदर्शनाकडे पावले चालायला लावणारी. बाकी, थोरले बाजीराव पेशवे सभागृह सुरू झाले आणि सांस्कृतिक, वैचारिक कार्यक्रमांना हक्काची जागाच मिळाली. या कमानीची वाट चालत गेलो तो थेट पेशवे सभागृहातच... एका प्रदर्शनाच्या निमित्ताने...

प्रदर्शन

स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवाच्या सांगतेनिमित्त भारत सरकारने पुरस्कृत केलेल्या कार्यक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख व दर्शनिका विभागाच्या वतीने स्वातंत्र्यआंदोलनइतिहासाचे ग्रंथ व अभिलेखप्रदर्शन. हे प्रदर्शन आमच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात भरविले होते. अत्यंत दुर्मिळ अशी छायाचित्रे, ग्रंथ, दर्शनिका या सर्वांचे या प्रदर्शनातील दर्शन केवळ माहितीपूर्णच नव्हे तर अवाक् करणारे, अत्यंत मोहक होते. विशेषतः प्रथमच प्रदर्शित करण्यात आलेले दस्तऐवज तर खास दर्शनीय होते. विद्यार्थ्यांसाठी, स्वातंत्र्योत्तर पिढ्यांसाठी खरे तर हे प्रदर्शन फिरत्या स्वरूपात ठेवून शाळेशाळेपर्यंत पोहोचणे ही आजच्या काळाची गरज आहे.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन ठाण्याचे महापौर प्रेमसिंग रजपूत यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी प्राच्यविद्या संस्था, ठाणे, हिचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व डॉ. मो.दि. पराडकर यांचा परिसंवादही आयोजिण्यात आला होता. प्रदर्शनाचा कालावधी २ ऐवजी ३ दिवस केला गेला. खरे तर ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट असा प्रदर्शनाचा कालावधी असता तर आणखी किती तरी लोकांना प्रदर्शन पाहण्याची संधी मिळाली असती.

ध्वजवंदन

प्रतिवर्षाप्रमाणे महाविद्यालयपरिसरातील ध्वजवंदनाचा कार्यक्रम एकत्रितपणे दि. १५ ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी संपन्न झाला. सदर कार्यक्रमाच्या वेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांना एन्.सी.सी.

च्या आर्मी (मुले व मुली) तसेच नेव्ही व राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी सलामी दिली.

जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी 'रंग' हे छोटेसे पथनाट्य सादर केले. तर ओंकार विजय परांजपे या छोट्या विद्यार्थ्याने देशभक्तिपर गीत सादर केले.

आदरणीय डॉ. वा.ना.बेडेकर यांनी एन्.सी.सी.च्या विद्यार्थ्यांना शपथ दिली. आपल्या समयसूचक भाषणात बोलताना ते म्हणाले, 'पन्नास वर्षांपूर्वीचे प्रश्नही आपण सोडवू शकलो नाहीत. उलट महागाईसारख्या प्रश्नाची तीव्रता वाढत चाललेली आहे. हे प्रश्न दूर करण्याचे आव्हान, तरुण पिढीने पेलण्याची आजच्या काळाची गरज आहे.

सदर राष्ट्रीय दिनी विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.श्री.वि. करंदीकर, कार्यवाह श्री. अ.धो.टिल्लू, श्री. मराठे, श्री. ल.ग.देव, श्री. उत्तम जोशी, श्री. दिलीप जोशी तसेच बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील, कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. स.वा. गोखेले, व्यवस्थापन संस्थेचे संचालक श्री. भालचंद्र दाते, तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. मुजुमदार, विधि महाविद्यालयाचे प्राचार्य, इंजिनियर आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एक उपयुक्त कार्यशाळा

आमच्या विद्याप्रसारक मंडळाच्या वतीने रविवार दि. १६ ऑगस्ट १९९८ रोजी 'माहिती तंत्रज्ञान व ग्रंथालयाचे संगणकीकरण' या विषयावर एक अर्धदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. आमच्या महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या कार्यशाळेस अनेक शालेय, महाविद्यालयीन ग्रंथपाल, ग्रंथालयशास्त्राचे विद्यार्थी आणि ग्रंथालयप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काळाची गरज ओळखून प्रागतिक दृष्टीने विद्याक्षेत्रातील विविध उपक्रम हाती घेणे, ते राबविणे ही आमच्या विद्याप्रसारक मंडळाची परंपरा आहे. त्या दृष्टीने आमचे मार्गदर्शक डॉ. विजय बेडेकर यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्याचा निर्णय जेव्हा घेतला तेव्हाच अशी कार्यशाळा घेण्याचा विचारही त्यांनी बोलून दाखविला. या कार्यशाळेचा विशेष म्हणजे अशा प्रकारची खाजगी संस्थेने संयोजित केलेली ही पहिलीच कार्यशाळा होय.

## उद्घाटनाचा समारंभ



श्रीयुत मंजुनाथ दीप प्रज्वलन करताना. मागे उभे डावी कडून उजवीकडे डॉ. वि. वा. बेडेकर, डॉ. वा.ना. बेडेकर , डॉ. शिवकुमार, डॉ. गणपुले

या कार्यशाळेचे उद्घाटन आय.आय.टी.मुंबई येथील संगणक अभियांत्रिकी विभागातील डॉ. जी. शिवकुमार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. त्यानंतर खास या कार्यशाळेसाठी बनविण्यात आलेल्या ग्रंथांचे प्रकाशन विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री.वि. करंदीकर यांच्या हस्ते झाले. इंटरनेटवर विद्याप्रसारक मंडळाची 'वेब साईट' आहे. तिचे उद्घाटन श्री. अचलकुमार टिल्लू, कार्यवाह , विद्याप्रसारक मंडळ यांच्या हस्ते झाले.



श्री. श्री.वि. करंदीकर स्मरणिकेचे प्रकाशन करताना.

सर्व यंत्रणांनी परिपूर्ण असणाऱ्या या सभागृहात चित्रपारदर्शिका, इंटरनेट आदी सोयी उपलब्ध आहेत. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी आमच्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. ते म्हणाले, ''जागतिक स्तरावर माहितीतंत्रज्ञान क्षेत्रात भारताला आपले स्थान निर्माण करावयाचे झाल्यास शासनाने काही पावले उचलणे अत्यावश्यक आहे. संगणक क्षेत्रात भारतीय तंत्रज्ञांचे नाव अग्रेसर आहे. काळाची गरज ओळखून आमच्या संस्थेनेही महाविद्यालय परिसरातील सुमारे एक लाख ग्रंथांचे संगणकीकरण करण्याचे ठरविले आहे. त्या दृष्टीने आजच्या कार्यशाळेतील मार्गदर्शकांचे विचार आम्हाला निश्चितच उपयुक्त ठरणार आहेत.''

## शिवकुमार यांचे व्याख्यान

डॉ. जी. शिवकुमार आपल्या प्रमुख भाषणात ''माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षणातील स्थान'' या विषयावर बोलले. ''तंत्रज्ञानामुळे पारंपरिक शिक्षण पद्धतीमध्ये मूलभूत बदल करावे लागणार असून त्या दृष्टीने आपल्यातील कार्यक्षमता वाढवावी लागणार आहे'' असे सांगून मल्टि मीडिया, हायपर लिंकिंग, सर्चेबल इंडेक्सिंग यांचा विकास कसा करता येईल याचे त्यांनी पारदर्शिकांचा वापर करून विवेचन केले. ''ऑपरेशन नॉलेज'' या संकल्पनेचाही त्यांनी परामर्श घेतला.

## डॉ. शरच्चंद्र गणपुले

मुंबई विद्यापीठाचे माजी ग्रंथपाल व ग्रंथालयशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ.श.रा. गणपुले यांनी ''संगणकीकरण : काही प्रश्न व उपाय'' या विषयावर शोधनिबंध सादर केला. संगणकीकरण प्रक्रियेत ग्रंथालयाच्या विविध विभागांत येणाऱ्या व्यवहार्य अडचणींचा आढावा घेताना ते म्हणाले, ''ग्रंथालयाच्या संगणकीकरणाचे यश संगणकात भरल्या जाणाऱ्या माहितीतील तपशिलाच्या परिपूर्णतेवर अवलंबून असते. असा तपशील भरणे हे अवघड व खर्चीक काम असते.'' या संदर्भात ग्रंथपालांना वा माहिती भरणाऱ्या तंत्रज्ञाला येऊ शकणाऱ्या अडचणींवर त्यांनी उपायही सुचविले.

## प्रा. श्रीमती हर्षा पारेख

मावळणारे शतक व उगवणारे शतक हे माहितीच्या महाजालाने (इंटरनेट) व्यापून टाकले आहे. या माहितीच्या महाजालाचे शैक्षणिक ग्रंथालयात काय स्थान असू शकेल याचा ऊहापोह श्रीमती ना.दा. ठाकरसी विद्यापीठाच्या ग्रंथपाल प्रा.श्रीमती हर्षा पारेख यांनी आपल्या शोधनिबंधात केला. इंटरनेटची व्याख्या देण्यापासून ते भारतात झालेल्या इंटरनेटच्या प्रगतीपर्यंतची माहिती अतिशय प्रभावीपणे त्यांनी मांडली. या महाजालाशी जोडल्या जाण्यासाठी, असणाऱ्या ग्रंथालयांचा आढावा घेऊन शैक्षणिक ग्रंथालयांसाठी हे महाजाल कसे वापरता येईल हे त्यांनी सांगितले.

आपल्या शोधनिबंधाचा समारोप करताना त्या म्हणाल्या, 'माहिती तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार होण्यापूर्वी शैक्षणिक ग्रंथालयांनी आपल्याला नेमके काय हवे आहे ते कसे करावयाचे आहे याचा पुनर्विचार करण्याची आज गरज आहे. त्याकरिता काळजीपूर्वक नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे.'

या पद्धतीची ही पहिलीच व अत्यावश्यक अशी कार्यशाळा असल्याचे नमूद करून विद्याप्रसारक मंडळाचे त्यांनी विशेष अभिनंदन केले.

### श्री. बी.के.मंजुनाथ

इंदिरा गांधी संशोधन व विकास संस्थेचे प्रमुख ग्रंथपाल श्री.जी.के. मंजुनाथ यांनी '' ग्रंथालयांचे संगणकीकरण का व कसे'' या विषयावरील शोधनिबंध सादर केला. ते म्हणाले,''१९७० च्या सुमारास काही विशेष ग्रंथालयांमध्ये सुरू झालेले संगणकीकरण आज बहुतेक विद्यापीठ ग्रंथालयापर्यंत पोहोचले आहे. परंतु महाविद्यालयांमध्ये ग्रंथालयांसाठी अजून संगणकाचा वापर मर्यादित आहे. अजूनही पारंपरिक पद्धतीची ग्रंथालयकलिका सर्व प्रश्नांच्या उत्तराचे साधन म्हणून वापरली जाते. परंतु कलिकीकरण व रचना हे अतिशय अवघड काम असते. संगणकीकरण झाल्यास बेकारी वाढेल, खर्च खूप येऊन, ग्रंथालयसेवकांचे प्रशिक्षण करावे लागेल, व्यवस्थापन मंडळाचे सहकार्य मिळणार नाही, व सर्व जुन्या ग्रंथांचे संगणकीकरण करणे (Retrospective Conversion) हे व असे प्रश्न आहेत.''

आपल्या शोधनिबंधात त्यांनी संगणकीकरण करू इच्छिणाऱ्या नव्या ग्रंथपालांना आवश्यक ठरेल असे मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. विजय बेडेकर यांनी केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विद्याप्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह अनेकांनी कष्ट घेतले. स्वतः डॉ. विजय बेडेकर यांचे मार्गदर्शन या सर्वांना लाभत होते. १० म्हणजे १०ला सुरुवात व २ म्हणजे २ला शेवट ही शिस्त वाखाणण्यासारखी होती. वक्त्यांच्या प्रमुख भाषणानंतर श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तज्ज्ञांनी उत्तरे दिली. कार्यशाळेस अनेक शालेय, महाविद्यालयीन ग्रंथपाल, ग्रंथालयप्रेमी वाचक, विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सी.जी.पाटील, तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. श्री. मुजुमदार, अनेक प्राध्यापक तसेच मुंबई विद्यापीठ व एस.एन.डी.टी. विद्यापीठ यांतील ग्रंथालयशास्त्राचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.श्री.वि.करंदीकर यांनी आभारप्रदर्शन केले.

### प्रगत अभ्यासकेंद्रातील उद्घाटन

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या अध्ययन शास्त्रातील पदव्युत्तर पदविका अभ्याससत्राचे शैक्षणिक वर्ष उद्घाटन समारंभाने सुरू झाले. सदर प्रसंगी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे (TFIPL, Thane) डेप्युटी मॅनेजर डॉ. हब्बू व लॅब इंडिया लिमिटेड चे डॉ. निमकर उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय केंद्राचे संचालक व बांदोडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी.जी. पाटील यांनी करून दिला. शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ व विविध विषयांत रस असणारे डॉ. विजय हब्बू यावेळी बोलताना म्हणाले, ''ठाणे बेलापूर पट्टीतील कारखान्यांवर अवलंबून राहण्यापेक्षा ही पदविका पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांनी मुंबईबाहेर स्वतःचे उद्योग सुरू करणे ही काळाची गरज आहे.'' हर्बल शाम्पू सारखी उत्पादनक्षेत्रे भरपूर वाव असणारी आहेत, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास एम्.एस्सी.चे विद्यार्थी तसेच या केंद्रातील आजीमाजी विद्यार्थी उपस्थित होते. सदर केंद्राचे संचालक व बांदोडकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सी.म. सारंग यांनी आभारप्रदर्शन केले.

### जोशी बेडेकर महाविद्यालयात आयुक्त टी. चंद्रशेखर

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या ९८-९९ या शैक्षणिक वर्षाकरिता असणाऱ्या विद्यार्थिप्रतिनिधि मंडळाचे औपचारिक उद्घाटन थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाले. उद्घाटनासाठी महानगरपालिकेचे आयुक्त टी. चंद्रशेखर उपस्थित होते.




विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी टी. चंद्रशेखर

ठाण्यातील रस्तारुंदीकरण मोहिमेतून प्रसिद्धीस आलेले व कर्तबगार म्हणून गौरविण्यात आलेले आयुक्त टी. चंद्रशेखर यांना पाहण्यासाठी तरुण पिढीने केलेली गर्दी अभूतपूर्वच होती. पेशवे सभागृह खचाखच भरले होते व बाहेरच्या जिन्यातही विद्यार्थी उभे होते.

उद्घाटनाच्या कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने करण्यात आली. त्यानंतर प्राचार्य स.वा. गोखले यांनी श्री. चंद्रशेखर यांचा परिचय करून दिला. या वेळी सभागृहातील विद्यार्थ्यांशी बोलताना ते म्हणाले, "कोणतीही नागरी समस्या सोडविण्यास लागणारी अंतिम शक्ती नागरिकांमध्येच असते. शासनयंत्रणा किंवा त्या यंत्रणेतील आमच्यासारखे अधिकारी हे निमित्तमात्र असतात." रस्तारुंदीकरणाच्या कामाला लोकांनी आपणहून दिलेला प्रतिसाद महत्त्वाचा होता हे मान्य करूनही शहर सुशोभीकरणा करिता झाडे दत्तक घेण्यासाठी मात्र फारच थोडे जण पुढे येतात. याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. ते पुढे म्हणाले, "या महाविद्यालयाच्या परिसरविकासासाठी सहकार्य देण्यास आपण तयार आहोत. मात्र युवकांनी त्यासाठी पुढे आले पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याने रोज एक तास शहरासाठी दिला तर शहराचा कायापालट होईल."

समारंभात विद्यार्थिप्रतिनिधि मंडळाच्या नेमणुका जाहीर झाल्या. विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.श्री.वि.करंदीकर यांच्या भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला. विद्यार्थिप्रतिनिधी कु. शिल्पा खरे हिने आभारप्रदर्शन केले तर प्रा. कविता पीटर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलान केले.

## कै. गुणाकर जोशी पुण्यस्मरण

५ ऑगस्ट रोजी विद्याप्रसारक मंडळाच्या महाविद्यालयीन जडणघडणीत मोठा वाटा असणारे तत्कालीन कार्याध्यक्ष कै.गुणाकर जोशी यांची पुण्यतिथी होती. याच महिन्यात आमच्या मंडळाचे एक प्रमुख देणगीदार कै. दयानंद बांदोडकर यांचीही पुण्यतिथी (१२ ऑगस्ट) होती.

कै. गुणाकर जोशींच्या स्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या व्यवस्थापन संस्थेत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ५ ऑगस्ट रोजी झालेल्या या व्याख्यानाचे वक्ते होते, बायर ग्रुप ऑफ कंपनीजचे डायरेक्टर श्री. माधव जोशी. पेशवे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात झाली श्री. टेमघरे यांनी सादर केलेल्या ओंकारस्वरूप या गीताने. कै. गुणाकर जोशींच्या प्रतिमेस आमच्या संस्थेचे व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.वा.ना.बेडेकर यांनी हार घातला व दीपप्रज्वलन केले. व्यवस्थापन संस्थेचे संचालक यांनी आपल्या प्रास्ताविकात पुढील रौप्य महोत्सवी वर्षात करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. श्री. माधव जोशी यांनी पारदर्शिकांच्या आधारे 'मुक्त आर्थिक धोरण आणि व्यवस्थापकांपुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान दिले. व्यवस्थापकाला जर आपल्या व्यवसायात यशस्वी व्हावयाचे असेल तर निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे, हे त्यांच्या व्याख्यानाचे सूत्र होते. त्यांचा परिचय प्रा. म्हात्रे यांनी करून दिला.

मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.श्री.वि.करंदीकर यांनी इंटरनेटची, तर श्री. शरद कोर्डे व दिवाण यांनी संस्थेत सुरू होणाऱ्या दोन अभ्यासक्रमांची माहिती दिली. या वर्षीच्या यशस्वी विद्यार्थ्यांना श्री. माधव जोशी यांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

## तंत्रनिकेतन

जुलैअखेरपासून सुरू होणारी तंत्रनिकेतनातील प्रवेशाची धावपळ ऑगस्ट संपता संपता संपत आलेली असते. तंत्रनिकेतनाचा ९७-९८ या वर्षाचा निकाल परंपरेनुसार चांगला लागला. प्रथम वर्ष परीक्षेतील ८०.८१%, द्वितीय वर्ष परीक्षेतील ७५.८४%, तर तृतीय वर्ष परीक्षेतील ८०.२०% विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

दरम्यान, प्रथम वर्ष पदविकेसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या नवीन अभ्यासक्रमाचा शुभारंभ थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाला. या अभ्यासक्रमाचे प्रमुख श्री. टकले यांनी स्वागतपर भाषण केले तर प्राचार्य श्री.श्री.मुजुमदार यांनी अभ्यासक्रमाची माहिती दिली.

समारंभासाठी विद्याप्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अ.घो.टिल्लू अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री.टिल्लूसर म्हणाले, "गणित व इंजिनियरींगचे काही विषय यात येणारे अपयश लक्षात घेता अधिक कसोशीने मेहनत करणे गरजेचे आहे. पूर्व शिक्षण मराठी माध्यमातून झालेले असले तरी कोणताही न्यूनगंड न बाळगता पाठांतराने इंग्रजीवर प्रभुत्व मिळविता येते." त्यासाठी आपण कशी मेहनत घेतली होती याचे उदाहरण त्यांनी विद्यार्थ्यांना दिले. "तंत्रनिकेतनातील सर्व प्राध्यापक विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी तत्पर असतात." असेही ते म्हणाले.

शिक्षकशिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देण्यात आल्यावर प्रा. विद्याधर वालावलकर यांच्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

दि. १३ ऑगस्ट रोजी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) नवी दिल्ली येथून आलेल्या एका प्रतिनिधिमंडळाने तंत्रनिकेतनास भेट दिली. या वेळी instrumentation या अभ्यासक्रमासाठी अधिक जागा वाढविण्यासंदर्भात त्यांनी चर्चा केली.

### टीप व विनंती

विद्याप्रसारक मंडळाच्या सर्व घटक संस्थांच्या प्राचार्यांनी /प्रमुखांनी सदर सदरात आपल्या संस्थेचे वृत्त संकलित करण्याकरिता छायाचित्रांसह माझ्याकडे (म्हणजे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालयात) कृपया पाठवावे. यासाठी 'दिशा' मधील हे सदर उत्सुक असते. तसेच स्वतंत्र लेख लिहिण्याची इच्छा असल्यास 'दिशा' या आपल्या कुटुंबाच्या व्यासपीठाला प्राधान्य द्या.

• • •

(पान क्र. १९ वरून)

### एकनाथांचे 'रुक्मिणी स्वयंवर'

दुसऱ्याने काढले असावे. किंवा चित्रकार दुसराच कोणी असावा.

अ) कित्येक ठिकाणी लेखन एकहाती वाटत नाही.

ब) लेखन बऱ्याच ठिकाणी अशुद्ध आहे.

क) गाळलेले शब्द ✓ खूण वापरून ओळीच्या वर अथवा समासात लिहिले आहेत.

ड) अनेक ठिकाणी अनुस्वार नाहीत.

इ) इत्यादी दोष असून सुद्धा पोथी आकर्षक आहेच.



ही तसबीर आहे नारो गोपीनाथ साठे यांची.

• • •

(मुखपृष्ठ २ वरून)

संपादकीय

मेरा भारत महान

काही स्वतंत्र विचार करू शकेल किंवा विज्ञानामध्ये प्रगती दाखवू शकेल हा विश्वास पाश्चात्यांना वाटत नाही. या सर्व अडथळ्यांच्या शर्यतीवर मात करूनही भारतीय वैज्ञानिक आणि व्यापारी यांनी जी प्रगती केली आहे ती नेत्रदीपकच आहे. भारतीय वैज्ञानिक प्रगतीला कमी लेखण्याचा प्रयत्न पाश्चिमात्य राष्ट्रे नेहमीच करतात.

या बाबतीत प्रा. अब्दुल कलाम यांनी जे सांगितले ते बोलके आहे.

One aspect, which is interesting,is how, whenever India achieves something that is commendable, the developed countries tend to trace it to some knowhow, equipment or man power that was provided by the West. For instance, in July 1980, when we launched our first SLV and put Rohini satellite into orbit, india became one of four nations to have a satellite launch facility. But within a week, a news item originated from USA saying that I had had a few months training at NASA and that is where I picked up the technology that was used for the launch. This was supported by the rest of the Western press. In Germany they claimed that the wind tunnel test was carried out in their facilities, and so they had indirectly enabled the launch.

When we heard the news about the reactions of the Western scientists, technologists and the press the general response of my team of scientists and technologists at VSSC, Trivandrum was one of great amusement. We knew thousands of scientists, engineers and staff had worked on the project from the drawing board to the development stage and right through till the launch. The technology was completely indigenous. The SLV used proportional control for its first stage control systems with a sharing logic software. This was a first in the world. Similarly, we had made other innovations in comparison to any launch vehicle at that point of time.

As for the scout, the American satellite launch vehicle from which our technology was alleged to be lifted, only the fifth launch of the scout had proven successful. In comparison, our second, third and fourth launches were all successful. This is a pointer to the technological strength of our nation.

Again, when I was involved in the Guided Missile Programme and we successfully launched the Prithivi missile several times, the western press including some of our own analysts insisted that we were using Russian technology In fact, Prithivi had a distinctive design, using a particular gyro system with a uniquely configured software, which nobody in the world had tried; when the flight is in progress, the drift can be monitored through the onboard computer. It had other innovations too: the type of thrust termination is so innovatively configured that for a multiple payload, multiple ranges can be achieved. Today, Prithivi is comparable to any world class missile system, and probably is the best of its class in payload capability.

Let's come now to a third, very important milestone, namely Agni. We launched Agni in 1989 and it was successful. we have so far done three launches. Surprisingly, again, there were two claimants who wanted to take credit for the success. Germany said that their guided system which was used for scientific experiments in India had gone into the making of Agni. And the USA claimed again that my NASA training was responsible for Agni. Actually, in Agni, there were innovations made in the guidance technology.

We can manoeuver the payload and the complete re-entry hypersonic flow was simulated in the computational Fluid Dynamics in one of the best computers that we ourselves have designed. The re-entry structure, in fact, has used a specially designed material to withstand the

3500 degree C heat generated upon reentering the atmostphere. it is really amusing that the Americans think that it is only with their technology that India can succeed.

Recently two departments, DAE and the DRDO, working in an excellent partnership, tested several nuclear devices in Pokhran. Three tests were carried out simultaneously, there were two more tests subsequently. We had excellent results, well reported universally by 125 seismic stations. This indicates that India had reached the stage of nuclear weaponisation. We were extremely happy with our achievement.

But the next day we found the western press alleging that Israele technology had gone into the triggering system of nuclear device. There was also the familiar accusation that the scientists who had visited the USA had helped India achieve this breakthrough. This was puzzling because nobody in the world has used the type of triggering mechanism we have developed. Multiple innovations have gone into the nuclear technology and nuclear device testing area.

In all four of these cases, I was fortunate to be continously involved directly or indirectly in various teams of ISRO, DAE and DRDO. I find myself asking why in spite of innovative and excellent design capabilities in India, an impression is created by the west that no one other than the developed nations can achieve such technological excellence. Just as there has been a racial element in human history, it would appear that this element is entering into the technological arena too. Developed nations feel that only they are capable of developing certain types of aerospace, missile and nuclear technology. But we should ignore this and go ahead with technological development.

(Courtesy Vision 2020)

•••

## **बोधामृत** - काय सांगते नाव तुम्हा हे.

डॉ. - डॉक्टर, वैद्य, वकील होण्या
ज्ञानसाधना तुम्ही करा.

बे. - बेकारीला दूरची हटवा विवेक सारासार करा.

डे. - डेलियाच्या फुलासारखे प्रसन्नतेने तुम्ही जगा.

क. - कातील ह्या बळावरी हो हिम्मत तुम्ही मनी धरा.

र. - रममाणची मग होवूनी जीवनी जीवनरथ हा तुम्ही हाका.

वि. - विश्वासाला संगे घेउनी कर्तव्याची पूर्ति करा.

द्या. - द्या हो जगता हात मदतीचा सर्वांसाठी तुम्ही सदा.

मं. - मंगलतेचे विचार बोलुनी सर्वांवरती प्रेम करा.

दि. - दिन हे येती मग सौख्याचे उणे न तेथे काहि जरा.

र. - रजतम षड्रिपू नष्टचि होती सर्वांनी हे ध्यानि धरा.

सौ. शरयू गलांडे

•••

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

## थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्थ जागा.

संपर्क

कार्यवाह,
विद्याप्रसारक मंडळ, ठाणे
दूरध्वनी : ५४२ ६२७०